मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
www.rajdand.com
। पश्चिम महाराष्ट्र ।
follow us : /rajdandlive




नव्या भारतात लोकशाही धोक्यात : डॉ. शशी थरूर
वृत्त पान ३ वर...

⁂ RNI Regd. No. 72105/99 ⁂ वर्ष २५ ⁂ अंक २३९ ⁂ सातारा ⁂ बुधवार, दि. ८ मे २०२४ ⁂ पाने ८ (सुप्रभात) ⁂ किंमत ५/– रूपये

## थोडक्यात

### तापमान ४४ अंशा पलीकडे जाणार, सतर्कतेचा इशारा!

**मुंबई :** देशभरात निवडणुकांचे वारे वाहत असताना अनेक राज्यात वाहणाऱ्या उष्ण वाऱ्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. अशातच सूर्य आणखी आग ओकणार असून तापमान ४४ अंशाच्या पलीकडे जाणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने दर्शवला आहे. त्यामुळे राज्यातील काही भागात नागरिकांना आणखी उन्हाच्या झळा सोसाव्या लागणार आहेत. महाराष्ट्रातील हवामानात सातत्याने बदल होत असले तरीही राज्यातील उकाडा कमी होत नाही. हवामान खात्याने सांगितल्याप्रमाणे, विदर्भातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळाची शक्यता तसेच वेगाने वारे वाहत हलका पाऊस पडण्याचा अंदाज वर्तवला आहे.

### महाडमध्ये मतदाराचा मृत्यू

**मुंबई :** महाराष्ट्रातील ११ मतदारसंघांमध्ये आज मतदान पार पडत असून त्यामध्ये रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघाचाही समावेश आहे. मात्र या मतदारसंघामध्ये मतदानाला जाताना एका मतदाराचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. प्रकाश चीनकटे असं मृत्यू झालेल्या मतदाराचं नाव आहे. मतदान करायला जात असतानाच त्यांना मतदान केंद्राजवळ चक्कर आली आणि तिथेच ते खाली कोसळले. उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे.

### सलमान खानच्या घरावर गोळीबार प्रकरणात पाचव्या आरोपीला अटक!

**मुंबई :** अभिनेता सलमान खानच्या घरावर गोळीबार प्रकरणात मोठमोठे खुलासे होत आहेत. या प्रकरणात मुंबई पोलिसांचा वेगाने तापास सुरु असून आता पाचव्या आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हे शाखेने मोहम्मद चौधरी नावाच्या आरोपीला राजस्थानवरुन अटक केली आहे.

# तिसरा टप्पा : राज्यात ५५.२१% मतदान

## कोल्हापूर-हातकणंगले लोकसभा मतदारसंघात सर्वाधिक ६२.१८% तर बारामती लोकसभेत सर्वात कमी ४६ % मतदान

**मुंबई : राज्यात आज लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यात ११ जागांसाठी मतदान झाले आहे. सकाळी ७ वाजल्यापासून मतदानाला सुरुवात झाली तर सायंकाळी ६ वाजेपर्यंत सर्वच मतदान केंद्रावंर मतदाराच्या रांगा पाहायला मिळाल्या.**

निवडणूक आयोगाकडून मिळालेल्या आकडेवारीनुसार सायंकाळी ५ वाजेपर्यंत राज्यात ५३.४०% मतदान झाले आहे. तर लातूर - ५५.३८ %, सांगली - ५२.५६ %, बारामती - ४६%, हातकणंगले- ६२.१८%, कोल्हापूर - ६३.७१%, माढा - ५०%, धाराशिव - ५२.७८%, रायगड - ५०.३१%, रत्नागिरी - ५३.७५%, सातारा - ५४.११% व सोलापूर लोकसभा मतदारसंघात ४९.७% मतदान झाले. यात विशेष करून कोल्हापूर व हातकणंगले लोकसभा मतदारसंघात सर्वाधिक मतदान झाले. तर बारामती लोकसभा मतदारसंघात सर्वात कमी मतदान झाले आहे.




देशाच्या आणि महाराष्ट्राच्या मताधिक्याच्या सरासरीपेक्षा सर्वाधिक मतदान कोल्हापूर जिल्ह्यात झाले आहे, अशी माहिती जिल्हा माहिती अधिकारी यांनी दिली.

जिल्हाधिकारी तथा निवडणूक अधिकारी अमोल येडगे म्हणाले की, सांयकाळी ५ वाजेपर्यंत कोल्हापूर - ६३.७१% आणि हातकणंगले ६२.१८% मतदान यात सरासरी २ ते ३% वाढ होण्याची शक्यता आहे.

राज्यातील सर्वाधिक चर्चेत असलेल्या बारामती लोकसभा मतदारसंघात सायंकाळी पाच वाजेपर्यंत ४५.६८ टक्के मतदान झालं. इतर मतदारसंघांच्या तुलनेत हे मतदान कमी असल्याचं दिसतंय. बारामतीमध्ये यावेळी सुप्रिया सुळे विरूद्ध सुनेत्रा पवार अशी लढत होत असून शरद पवार आणि अजित पवारांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे.

राज्यातील तिसऱ्या टप्प्यामध्ये ११ मतदारसंघात निवडणूक होत असून त्यामध्ये आतापर्यंत सर्वाधिक मतदान हे कोल्हापूर आणि हातकणंगलेमध्ये झाल्याचं दिसतंय. सायंकाळी पाच वाजेपर्यंत कोल्हापूरमध्ये ६३.७१ तर शेजारच्या हातकणंगलेमध्ये ६२.१८ टक्के मतदान झालं आहे. कोल्हापूरमध्ये महाविकास आघाडीचे शाहू महाराज आणि शिवसेनेचे संजय मंडलिक अशी लढत होत आहे.

# ईव्हीएम मशीनची पूजा केल्याप्रकरणी रूपाली चाकणकर यांच्या विरोधात गुन्हा

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** ईव्हीएम मशीनची पूजा केल्याप्रकरणी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांच्याविरोधात सिंहगड पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

निवडणूक अधिकाऱ्यानेच त्यांच्याविरोधात तक्रार केली असून रुपाली चाकणकर यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर या आज दि.(७ मे) रोजी खडकवासला परिसरातील एका मतदान केंद्रावर पोहोचल्या. मतदान सुरु होण्यापूर्वी त्या औक्षण करण्याचे ताट घेऊन मतदान केंद्रात दाखल झाल्या. त्यानंतर त्यांनी मतदान केंद्रातील ईव्हीएम मशीनची पूजा केली. त्यामुळे निवडणूक अधिकाऱ्यानेच त्यांच्याविरोधात तक्रार केली असून रुपाली चाकणकर यांच्यावर सिंहगड पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




### राजेंद्र गावित पुन्हा भाजपमध्ये दाखल

**पालघर :** पालघर लोकसभा मतदारसंघातील शिवसेनेचे खासदार राजेंद्र गावित यांनी भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश केला आहे.

भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीमध्ये त्यांचा पक्षप्रवेश पार पडला.

पालघर लोकसभा मतदारसंघातून विद्यमान खासदार असलेले राजेंद्र गावित यांना यावेळी शिवसेनेने उमेदवारी नाकारली होती. यानंतर त्यांनी उघडपणे नाराजी व्यक्त केली होती. मात्र, राजेंद्र गावित यांना विचारूनच आपण उमेदवार बदलला असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## हिरण्यकेशी बंधाऱ्यात एकाच कुटुंबातील तिघांचा बुडून मृत्यू

**कोल्हापूर :** आजरा तालुक्यातील गजरगाव येथील हिरण्यकेशी नदीवरील बंधाऱ्यात धुणे धुण्यासाठी गेलेल्या एकाच कुटुंबातील ३ जणांचा बुडून मृत्यू झाला. मंगळवारी सकाळी १० च्या सुमारास ही घटना घडली.



यासंबंधीच्या वृत्तानुसार, सुळे येथील उदय बचाराम कटाळे (५४), अरुण बचाराम कटाळे (५६) हे बंधू धुणे धुण्यासासाठी हिरण्यकेशी नदीच्या बंधाऱ्यावर गेले होते. यावेळी अरुण यांचा मुलगा जयप्रकाश (१३) बंधाऱ्यामध्ये धुणे धुत असताना अचानक बुडू लागला. हे पाहून अरुण यांनी त्याला वाचवण्यासाठी पाण्यात उडी मारली. त्यानंतर हे दोघेही बुडू लागले. या दोघांना वाचवण्यासाठी उदय व अन्य एकाने उडी मारली. पण दुर्दैवीने अरुण, जयप्रकाश व उदय या तिघांचाही बुडून मृत्यू झाला. एकाच कुटुंबातील ३ सदस्यांचा मृत्यू झाल्यामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# मतदानाच्या दिवशी सुप्रिया सुळे पोहोचल्या थेट अजित पवारांच्या घरी!

**बारामती :** लोकसभा निवडणुकीसाठी आज तिसऱ्या टप्प्यात मतदान सुरु आहे. यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासाठी सर्वात चुरशीची लढत असलेल्या बारामती मतदारसंघातही मतदान होत आहे. मात्र, त्यातच शरद पवार गटाच्या उमेदवार सुप्रिया सुळे यांनी एक लक्ष वेधून घेणारी कृती केली आहे. राष्ट्रवादीतील फुटीमुळे अजित पवार विरुद्ध शरद पवार असा संघर्ष टोकाला गेलेला (पान ५ वर)



# बारामती लोकसभा मतदारसंघामध्ये ४६ टक्के मतदान

■ किरकोळ अपवाद वगळता मतदान शांततेत

**बारामती :** संपूर्ण राज्यसह देशाचे लक्ष लागलेल्या बारामती लोकसभा मतदार संघांमध्ये एकूण ४६ टक्के मतदान झाले. सायंकाळी पाच वाजेपर्यंत बारामती लोकसभा मतदारसंघात सर्वाधिक मतदान बारामती विधानसभा मतदारसंघांमध्ये ५४.७५ टक्के झाले.

काही ठिकाणी किरकोळ अपवाद वगळता मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली. उन्हामुळे अनेक मतदान केंद्रामध्ये दुपारच्या वेळी निरोशांतता दिसून आली, मात्र सकाळी व सायंकाळच्या सुमारास मतदारांची गर्दी वाढली.

बारामती लोकसभा मतदार संघातील सहा विधानसभा मतदारसंघांमध्ये एकुण २३ लाख ७२ हजार ६६८मतदार यापैकी सायंकाळी ५ वाजेपर्यंत ४६ टक्के मतदारांनी मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. उन्हाची तीव्रता मोठ्या प्रमाणावर असल्याने उमेदवारांसह त्यांच्या समर्थकांमध्ये मतदानाबाबत मोठी सांशकता होती. अनेक मतदान केंद्रामध्ये सकाळपासूनच



आभार वृद्ध मतदारांचे नव मतदारांमध्ये मोठा उत्साह दिसून येत होता. बारामती शहरासह मोठ्या लोकसंख्येच्या गावांमध्ये असणाऱ्या मतदान केंद्रामध्ये मतदानासाठी रांगा लागल्या होत्या. बारामती मध्ये महाराष्ट्र देशातील प्रसिद्धी माध्यमांच्या प्रतिनिधींनी (पान ५ वर)

# दहा वर्षात खासदारांनी एकही कामाची चुणूक दाखवली नाही - माऊली दाभाडे

■ संजोग वाघेरेना मावळमधून किमान ५० हजारांचे मताधिक्य मिळवून देऊ

**वडगाव मावळ/प्रतिनिधी**

मागील दहा वर्ष मावळ लोकसभेचे नेतृत्व करण्याची संधी मतदारांनी बारणे यांना दिली.आम्ही सुध्दा त्यांचा प्रचार केला होता. मात्र त्यांनी दहा वर्षात एकही कामाची चुणूक दाखवली नाही. असा नामधारी खासदार काय कामाचा आहे अशी जोरदार टीका सहकार महर्षी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माऊली दाभाडे यांनी केली लोणावळा (पान ५ वर)



### बारामतीत लंडनहून आलेल्या युवकाने बजावला मतदानाचा हक्क

**बारामती :** तालुक्यातील रहिवासी असलेल्या साहिल संजीव बोराटे या परदेशात शिकत असलेल्या युवकाने खास भारतीय लोकशाहीचा उत्सव साजरा करण्यासाठी संविधानाने दिलेला हक्क बजावण्यासाठी आपल्या गावी येऊन मतदानाचा हक्क बजावला.



प्रत्येकाचं मत महत्त्वाचं आहे. सर्वांचा सहभाग हाच लोकशाहीचा पाया आहे. मतदान करणे हे आपले कर्तव्य आहे आणि लोकशाहीने दिलेला हा आपला अधिकार आहे. (पान ५ वर)

# शिरूर मतदारसंघात ‘घड्याळ’ नव्हे तर ‘तुतारी’चाच ‘गजर’ होणार!

**पुणे/प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यात सर्वांचे लक्ष लागून असलेल्या शिरूर लोकसभा मतदारसंघात प्रचार शिगेला पोहोचला अजून दोन्ही उमेदवार गावोगावी जाऊन प्रचार करत आहे. मात्र मतदारसंघात शरद पवार यांच्या पक्षाच्या तुतारीचाच आवाज असल्याची चर्चा असून खासदार डॉ. अमोल कोल्हे हेच निवडून येणार, अशी चर्चा मतदारसंघात होत आहे.

शिरूर लोकसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील हे निवडणूक लढवत आहे. तर महाविकास आघाडी कडून खासदार डॉ.अमोल कोल्हे हे निवडणूक लढवत आहेत. दोन्ही उमेदवारांचे प्रचार जोरदार सुरू असून विद्यमान खासदार डॉ. अमोल कोल्हे यांची प्रचारात आघाडी असल्याचे बोलले जात आहे. अमोल कोल्हे यांच्यासाठी शरद पवार यांनी मतदारसंघात सभा घेतल्याने त्यांच्या सभेला मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. त्यामुळे अमोल कोल्हे यांचा विजय निश्चित असल्याचे बोलले जात आहे.



■ **शरद पवार, उद्धव ठाकरे यांना मानणारा वर्ग मोठा**

शिरूर लोकसभा मतदारसंघात शरद पवार, उद्धव ठाकरे यांना मानणारा वर्ग मोठा असून राष्ट्रवादी, शिवसेना पक्ष फुटल्यानंतर शरद पवार, व उद्धव ठाकरे यांच्या बाबत मतदारसंघात सहानुभूती निर्माण झाली असून याचा फायदा खासदार डॉक्टर अमोल कोल्हे यांना होणार आहे. तसेच भाजप सरकारवर असलेले शेतकऱ्यांची नाराजी, आढळराव पाटील यांनी केलेली पक्षांतर हे देखील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाच्या पथ्यावर पडनार आहे.

### खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या संसद कामकाजावर मतदार समाधान

विद्यमान खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी गेली पाच वर्ष मतदारसंघात वेळ दिला नाही अशी टीका त्यांच्यावर केली जात आहे. मात्र खासदार डॉक्टर अमोल कोल्हे यांनी संसदेत शेतकऱ्यांसह विविध प्रश्नाबाबत आवाज उठवले असल्याची भाषणे सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत असून अमोल कोल्हे निदान संसदेत शेतकऱ्यांचे तरुणांचे प्रश्न मांडतात त्यामुळे त्यांची तरुण वर्गात मोठी क्रेझ आहे. तसेच ते सोशल मीडियावर एक्टिव असल्याने त्यांना मानणारा तरुण वर्ग मोठा आहे. डॉ. अमोल कोल्हे यांना पुन्हा एकदा संधी द्यावी अशी इच्छा तरुण वर्गाकडून व्यक्त होत आहे.

# काँग्रेस हा विकास विरोधी पक्ष, मराठवाडा त्याचा बळी

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची टीका

**परळी/प्रतिनिधी**

काँग्रेस हा विकासविरोधी पक्ष असून स्वतः काम करायचे नाही आणि इतरांनाही करू द्यायचे नाही, असे या पक्षाचे धोरण आहे. मराठवाडा देखील काँग्रेसच्या याच धोरणाचा बळी ठरला आहे, असा आरोप करतानाच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यापुढे मराठवाड्याचा विकास ही राष्ट्रीय लोकशाही आघाडीची जबाबदारी असेल, अशी ग्वाही देखील दिली. बीड लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार पंकजा मुंडे यांच्या प्रचारासाठी आयोजित करण्यात



आलेल्या सभेत पंतप्रधान बोलत होते. यावेळी केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री धनंजय मुंडे, भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह अनेक नेते व्यासपीठावर उपस्थित होते. काँग्रेसने कायम विकासकामांना विरोध केला आहे. आपण महाराष्ट्र आणि गुजरातला जोडण्यासाठी बुलेट ट्रेनचे काम सुरू केले. काँग्रेसने सुरुवातीला त्याची थट्टा केली. नंतर विरोध केला. महाविकास आघाडीच्या सरकारने हे काम ठप्प करून टाकले. राज्यातील शेतकऱ्याला आवर्षणग्रस्त परिस्थितीतून बाहेर काढण्यासाठी देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने सुरू केलेले जलसंधारणाचे अनेक प्रकल्प महाविकास आघाडीने आपल्या कार्यकाळात बंद केले. मात्र, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी जलसंधारणाची कामे मिशन मोडवर हाती घेतली आहेत. राज्यातील २७ जलसंधारण प्रकल्पांचा समावेश केंद्राच्या प्रधानमंत्री कृषी जलसंधारण योजनेत करण्यात आला आहे. त्यापैकी दहा प्रकल्प पूर्ण झाल्या असून इतर प्रकल्प ही लवकरच पूर्ण होतील, असा दावाही मोदी यांनी केला. काँग्रेस आणि दहशतवाद्यांचे नाते कोणते? देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईवर हल्ला करण्यासाठी आलेले कसाब आणि त्याचे दहा दहशतवादी साथीदार यांना क्लीन चीट देण्याची मागणी काँग्रेस करू लागली आहे. काँग्रेस सत्तेवर असताना सत्ताधाऱ्यांकडून त्यांचे स्वागत केले जात असे. त्यांच्या सर्वोच्च नेत्यांनी बाटला हाऊस येथे ठार करण्यात आलेल्या दहशतवाद्यांसाठी अश्रू (पान ५ वर)

# नाक खुपसेपणा

स्वतःच्या पायाखाली काय जळते, ते पाहण्यापेक्षा दुसऱ्याच्या घरात डोकावण्याचा असभ्यपणा अमेरिका कायम करीत आली आहे. जागतिक पोलिसीगिरीबरोबरच अन्य देशांतील वेगवेगळ्या मुद्यांवर तिथले सरकार आणि तिथल्या यंत्रणा अहवाल देत असतात. दुसऱ्या देशांत काय वाईट चालले, हे सांगताना त्यात दोन शब्द आपल्या देशात नेमकी त्या मुद्द्याबाबत काय स्थिती आहे, हे सांगितले असते, तर त्या अहवालांची विश्वासार्हता वाढली असती. जगभरातील देशांत मानवी मूल्यांची कशी गळचेपी होते, हे अमेरिका जाहीर करीत असताना एका गोऱ्या पोलिसाने काळ्या व्यक्तीचे मुंडके पायात दाबून त्याला मारल्याची घटना ताजी आहे. त्याचवेळी तिथले विद्यार्थी त्यांच्या छळाबाबत रस्त्यावर आले आहेत. मानवी हक्कांबाबत सर्वांनी जागरूक राहायला हवे. त्याबाबत दुमत असता कामा नये; परंतु त्याच वेळी इतरांच्या डोळ्यातील कुसळ पाहताना स्वतःच्या डोळ्यातील मुसळाकडे दुर्लक्ष होता कामा नये. तसे झाले, तर अंधत्व येण्याची शक्यता आहे. भारत आणि पाकिस्तानात पराकोटीचे मतभेद आहेत. त्यांच्याच शत्रूत्व आहे;परंतु अमेरिकन परराष्ट्र मंत्रालयाचे अहवाल दोन्ही देशांनी नाकारून त्यात कमालीची एकवाक्यता दाखवली आहे. अमेरिकेसारख्या देशाला आपल्या देशात नाक खुपसू द्यायचे नसेल, तर आपणही त्याच्या हाती कोलित देण्याची आवश्यकता नाही. मानवी हक्कांचे उल्लंघन होणार नाही, याची दक्षता घ्यायला हवी. विश्वकल्याणाच्या संकल्पनेत मानवी हक्कांची कल्पना अंतर्भूत आहेच. अमेरिकेने पाकिस्तानमधील मानवी हक्कांच्या अहवालात काही मुद्यांवर प्रकाश टाकला आहे. भारताबाबतच्या अहवालातही काही उदाहरणे दिली आहेत. न्यायबाह्य हत्या, लापता होण्याच्या घटना वाढल्या आहेत. गैरवर्तन करणाऱ्या अधिकाऱ्यांची ओळख पटवण्यासाठी आणि त्यांना शिक्षा करण्यासाठी पाकिस्तान सरकारने क्वचितच विश्वासार्ह पावले उचलली, असे अमेरिकेने एका अहवालात म्हटले आहे. '२०२३ कंट्री रिपोर्ट्स ऑन ह्युमन राइट्स प्रॅक्टिसेस' हा अहवाल प्रसिद्ध करण्यात आला. त्यातल विविध देशांमधील मानवी हक्कांचे उल्लंघन ठळकपणे दिसून आले. जगभरात मानवी सन्मान आणि स्वातंत्र्यासाठी संघर्ष करणाऱ्यांना अमेरिका नेहमीच पाठिंबा देईल, असे अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे. त्याचे स्वागत करताना अमेरिकेत होणाऱ्या मानवी हक्कांच्या पायमल्लीकडे कोणी लक्ष द्यायचे, की जागतिक पोलिसगिरी अमेरिका सोडून अन्य देशात करायची आणि कायद्याच्या राज्याच्या संकल्पनेला अमेरिकेत मूठमाती दिली जात असताना त्याकडे डोळेझाक करायची, याचेही आत्मचिंतन अमेरिकेने करायला हवे.

अमेरिकन कायद्यानुसार मानवी हक्कांबाबतता अहवाल काँग्रेसला सादर करणे आवश्यक आहे. अमेरिका जवळजवळ दोनशे देश आणि प्रदेशांमध्ये मानवी हक्क आणि कामगार अधिकारांच्या सन्मानाच्या स्थितीचे दस्तावेजीकरण करते. पाकिस्तानमधील काही महत्त्वाच्या मानवी हक्कांच्या मुद्द्यांमध्ये बेकायदेशीर किंवा मनमानी हत्या, न्यायबाह्य हत्या, सक्तीने बेपत्ता होण्याच्या विश्वासार्ह अहवालांचा समावेश आहे. सरकार किंवा त्याच्या एजंटांकडून अपमानास्पद वागणूक किंवा शिक्षा, तुरुंगातील कठोर आणि जीवघेणी परिस्थिती, राजकीय कैदी आणि दुसऱ्या देशातील व्यक्तींवर आंतरराष्ट्रीय दडपशाही,त्यात नागरिकांचा मृत्यू आणि सक्तीने बेपत्ता होणे यांचा समावेश आहे. पत्रकारांवरील हिंसाचार, त्यांना अन्यायकारक अटक, पत्रकार बेपत्ता यासह अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि मीडिया स्वातंत्र्यावर गंभीर निर्बंध, इंटरनेट स्वातंत्र्यावर गंभीर निर्बंध, धार्मिक स्वातंत्र्यावरील निर्बंध, देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संघटनांवर गंभीर सरकारी निर्बंध, पश्तून आणि हजारा समुदायाच्या सदस्यांसह धार्मिक, वांशिक आणि वांशिक अल्पसंख्याकांच्या सदस्यांना लक्ष्य करून हिंसा किंवा हिंसाचाराच्या धमक्या आणि सेमेटिझमद्वारे प्रेरित हिंसाचाराच्या धमक्यांचा समावेश असलेले गुन्हे आदींचा उल्लेख पाकिस्तानबाबतच्या अहवालात उल्लेख आहे. तिथले हे प्रकार नवे नाहीत. वर्षानुवर्षे सुरू आहेत; परंतु अगदी अलिकडच्या काही वर्षांपूर्वीपर्यंत या सर्व प्रकारांकडे डोळेझाक करून अमेरिका पाकिस्तानमध्ये कोटयवधी रुपयांच्या राशी ओतत होतीच ना? मानवी हक्कांचे उल्लंघन करणाऱ्या अधिकाऱ्यांची ओळख पटवण्यासाठी आणि त्यांना शिक्षा करण्यासाठी सरकारने क्वचितच विश्वासार्ह पावले उचलली, असे या अहवालात म्हटले आहे. बलुचिस्तानमधील उदाहरणे त्यासाठी अमेरिकेने दिली आहेत. सुरक्षा दलांनी देशभरात न्यायबाह्य हत्या केल्या आहेत, असे अहवालात म्हटले आहे. 'सेंटर फॉर रिसर्च अँड सिक्युरिटी स्टडीज'च्या स्वतंत्र थिंक टँकनुसार, २०२३ च्या पहिल्या तीन तिमाहीत दहशतवादी हल्ले आणि दहशतवादविरोधी कारवायांमध्ये किमान ३८६ पोलिस आणि लष्करी जवानांचा मृत्यू झाल्याची नोंद झाली आहे. मानवाधिकार संघटनांच्या म्हणण्यानुसार, अधिकाऱ्यांनी पश्तून, सिंधी आणि बलूच मानवाधिकार कार्यकर्ते तसेच सिंधी आणि बलूच राष्ट्रवाद्यांना कारण किंवा वॉरंटशिवाय अटक केली आणि बेपत्ता केले. पालकांवर दबाव आणण्यासाठी मुलांना ताब्यात घेण्यात आल्याचा आरोपही आहे. पाचशे सिंधी बेपत्ता आहेत.' व्हॉईस फॉर बलुच मिसिंग पर्सन' या गैर-सरकारी संस्थेच्या (एनजीओ) माहितीनुसार, जानेवारी ते जुलै दरम्यान प्रांतात १७७ बलुच व्यक्ती बेपत्ता झाल्या. २००० पासून ६,८०८ लोक जबरदस्तीने गायब झाले. अमेरिकेच्या अहवालानुसार, पोलिसांनी व्यक्तींना त्यांच्या सुटकेसाठी लाच घेण्यासाठी ताब्यात घेतले किंवा संशयितांना आत्मसमर्पण करण्यास भाग पाडण्यासाठी 'वॉन्टेड' व्यक्तींच्या नातेवाइकांना ताब्यात घेतले. पोलिसांनी कुटुंब आणि समुदायाच्या सदस्यांकडून लाच घेण्याच्या एकमेव हेतूने नातेवाइकांना अटक केली, असे या अहवालात म्हटले आहे.

पाकिस्तानने हा अहवाल नाकारल्यानंतर भारतानेही तेच पाऊल उचलले. भारताचा इशारा अधिक कडक होता. दुसऱ्या देशांच्या कारभारात नाक खुपसू नका, असा इशारा त्यात दिला आहे. भारतात एकीकडे लोकसभेच्या निवडणुका सुरू असताना हा अहवाल आला. आतापर्यंतचे दरवर्षाचे अहवाल पाहिले, तर त्यात अमेरिका मानवी हक्कांच्या उल्लंघनाबाबत आक्षेप नोंदवते. जागतिक मानवी हक्क आयोगाचे याबाबतचे अहवाल एकवेळ मान्य करता येतील; परंतु ज्या देशात मानवी हक्कांची पायमल्ली होते, त्या देशाने इतरांना मानभावी सल्ला द्यावा, हे जरा अतीच होते. अमेरिकेच्या परराष्ट्र खात्याने गेल्या आठवड्यात प्रसिद्ध केलेल्या एका अहवालात भारतात मानवी हक्कांची दुरवस्था असल्याचे म्हटले आहे. 'विश्वासार्ह माहितीच्या' आधारे हा अहवाल तयार करण्यात आल्याचे अमेरिकेने म्हटले आहे. आश्चर्यजनक बाब म्हणजे पाकिस्तान बाबतच्या अहवालात जशी निरीक्षणे नोंदवण्यात आली, तशीच भारताबाबतही आहेत. फक्त उदाहरणे वेगवेगळी दिली इतकेच. मानवी हक्कांच्या उल्लंघनाचे सर्वात मोठे उदाहरण म्हणून मणिपूरमधील हिंसाचाराचा दाखला अहवालात देण्यात आला आहे. ३ मे ते १५ नोव्हेंबर या काळात किमान १७५ जणांची हत्या झाली व ६० हजारांपेक्षा जास्त नागरिक निर्वासित झाले, असे या अहवालात म्हटले आहे. मणिपूरमध्ये कुकी व मैतेई या वांशिक गटांत उसळलेल्या हिंसाचारात मानवी हक्कांचे लक्षणीय उल्लंघन झाले. हे सांगण्यासाठी अमेरिकेची गरजच नाही. मणिपूरमध्ये भारतीय जनता पक्षाचे सरकार आहे. वांशिक हिंसाचार शमवण्याचा प्रयत्न राज्य सरकारने केल्याचे दिसले नाही. प्रशासनात वांशिक आधारावर फूट पडल्याचे दिसले.

तेथे महिलांवर अत्याचार झाले, स्त्री-पुरुषांची हत्या झाली.त्यावर मोदी सरकारवर टीका झाली आहेच; परंतु अमेरिकेने त्याला पुष्टी दिली इतकेच. उत्तर प्रदेशात हाथरसमध्ये सामूहिक बलात्कार व हत्येचे एक प्रकरण गाजले होते. त्याचे वार्तांकन करण्यास गेलेल्या सिद्दिक कप्पन या केरळमधील पत्रकारास उत्तर प्रदेश सरकारने विना चौकशी 'बेकायदा कृत्ये प्रतिबंधक कायदा' या कठोर कायद्याखाली तुरुंगात डांबले होते. तो मुस्लिम आहे हा त्याचा मुख्य 'गुन्हा' होता. त्याची गेल्या वर्षी सुटका झाली. या घटनेचा संदर्भही अमेरिकेच्या अहवालात आहे. हा अहवाल पूर्वग्रह दूषित आहे' असे म्हणत केंद्र सरकारने तो नेहेमीप्रमाणे फेटाळला आहे. इस्रायलने गाझा पट्टीत केलेल्या हल्ल्याचा निषेध करणाऱ्या अमेरिकेत विद्यार्थ्यांना अटक करण्यात आली. २०१९ मध्ये जामिया मिलिया विद्यापीठात घुसून निमलष्करी दलांनी विद्यार्थ्यांना बेदम मारहाण केली होती. पाकिस्तानमध्ये वर्षानुवर्षे भाषण स्वातंत्र्यावर परिणाम होत आहे. पत्रकारांना राजकीय पक्षांसह राज्य आणि राज्येतर कलाकारांकडून मोठ्या प्रमाणावर हिंसाचार किंवा हिंसाचाराच्या धमक्यांचा सामना करावा लागला. तथापि, कायद्याने नागरिकांना सार्वजनिकरित्या किंवा खासगीरित्या सरकारवर टीका करण्याची परवानगी दिली होती, परंतु न्यायालयाच्या निर्णयांनी लष्करी आणि न्यायव्यवस्थेवर टीका करण्यास मनाई म्हणून घटनेचा अर्थ लावला.शहरी आणि ग्रामीण भागात पत्रकारांना गंभीर गुन्ह्यांना सामोरे जावे लागत आहे, ज्यात एका महिला मीडिया कर्मचाऱ्यावर सिड हल्ल्याचा अहवाल आहे.

पत्रकारांवरील हिंसाचार आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरील हल्ल्यांचा मागोवा घेणारा देशांतर्गत 'मीडिया हक्क वॉचडॉग फ्रीडम नेटवर्क'च्या मते, मे २०२२ ते मार्च या कालावधीत पत्रकार आणि इतर मीडिया कर्मचाऱ्यांवर हल्ले आणि इतर प्रकारच्या हिंसाचाराची १४० प्रकरणे घडली. असे असले, तरी मानवी हक्कांच्या संदर्भातील अमेरिकी अहवालामागची मानसिकता, दुटप्पीपणा आणि त्यामागचे राजकारण समजून घ्यायला हवे. या अहवलात मणिपूरमधील अत्याचाराची घ

टना, अल्पसंख्याकांसाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांवरील हल्ले, काश्मीरसह विविध ठिकाणी वेळोवेळी करण्यात आलेली इंटरनेटबंदी, पोलिस चकमकीत आरोपींना ठार करण्याच्या घटना, विशिष्ट पत्रकार व स्वयंसेवी संस्थांच्या कार्यकर्त्यांवर ठेवण्यात आलेली पाळत, कॅनडास्थित खलिस्तानवाद्याची हत्या घडवून आणणे अशा भारताशी संबंधित अनेक घटनांची जंत्री देण्यात आली आहे. परकीय निधी मिळविणाऱ्या १८२७ स्वयंसेवी संस्थांची नोंदणी परकी निधी नियंत्रण कायद्यांतर्गत रद्द करण्याच्या निर्णयावरही अमेरिकी परराष्ट्र खात्याने बोट ठेवले आहे. देशात स्वायत्त न्यायसंस्था आहे आणि तिने अनेकदा सरकारला धारेवर धरले आहे,

तरीही ज्या उणीवा राहतात, त्या दूर करण्याचा प्रयत्न भारताने करायलाच हवा; परंतु दुसऱ्या देशाला त्यात नाक खुपसण्याचा अधिकार कुणी दिला? एका किरकोळ चोरीच्या आरोपावरून कृष्णवर्णीय व्यक्तीला एका गोऱ्या पोलिस अधिकाऱ्यांने कशा रीतीने चिरडून मारले, याचे दर्शन जगाला एका व्हिडिओमुळे घडले. स्वयंनिर्णय, मानवी हक्क आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्य वगैरे गोष्टींवरून विकसनशील देशांचे परीक्षण अमेरिका गेली काही दशके सातत्याने करीत आली आहे. निर्विवाद प्रभुत्व असल्याने ते बराच काळ ऐकूनही घेतले गेले; मात्र आता अमेरिकेला प्रतिप्रश्न विचारले जाऊ लागले आहेत. अमेरिकेने आधी आपला चेहरा आरशात पाहावा आणि मग इतरांची उठाठेव करावी; मात्र त्याच वेळी आत्मपरीक्षणाचा मार्ग आपणही सोडता कामा नये.

## 'विद्यार्थ्याचे भविष्य उद्ध्वस्त करू नका', हिंदी विद्यापीठाच्या कुलसचिवांवर न्यायालयाचे ताशेरे

**नागपूर :** वर्धा येथील महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठातून एका विद्यार्थ्याला निष्कासित करण्यात आले होते. याप्रकरणी विद्यार्थ्याच्या भवितव्याचा विचार करून त्याला परीक्षा देऊ देण्याचे तसेच परिसरात प्रवेश करू देण्याचे आदेश उच्च न्यायालयाने कुलसचिवांना दिले होते. मात्र कुलसचिवांनी न्यायालयीन आदेशाचे पालन न करता विद्यार्थ्यावर प्रवेश बंदी कायम ठेवली. यावर न्यायालयाने नाराजी व्यक्त करत विद्यार्थ्याचे भविष्य उद्ध्वस्त करू नका, अशा शब्दात कुलसचिवांवर ताशेरे ओढले आणि त्यांच्यावर अवमाननेचा खटला चालविण्याचाही इशारा दिला.

हिंदी विद्यापीठातील पीएचडीचा विद्यार्थी निरंजन कुमार याला विद्यापीठाच्या परिसरामध्ये प्रवेश नाकारण्यात आल्याने त्याने उच्च न्यायालयात अवमानना याचिका दाखल केली. या प्रकरणावर न्यायमूर्ती नितीन सांबरे आणि न्या. अभय मंत्री यांच्या खंडपीठासमक्ष सुनावणी झाली.

विद्यापीठाच्या कुलगुरूंनी राजीनामा दिल्यानंतर अनपेक्षितपणे आयआयएम नागपूरचे माजी संचालक भीमराया मेत्री यांची कुलगुरू म्हणून नियुक्ती करण्यात आली. याचा निषेध करीत विद्यार्थ्यांनी प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्यादरम्यान बॅनर लावले होते. परिणामी, निरंजन कुमारसह इतर विद्यार्थ्यांना निष्कासित करण्यात आले होते. विद्यापीठाच्या या निर्णयाविरोधात निरंजन कुमारने याचिका दाखल केली. न्यायालयाने १६ फेब्रुवारी रोजी विद्यापीठाच्या निष्कासित करण्याच्या निर्णयाला स्थगिती दिली होती.फपरंतु, अद्यापही विद्यापीठामध्ये प्रवेश नाकारण्यात येत असल्याचा आरोप निरंजन कुमारने केल्यानंतर न्यायालयाने कुलसचिवांना हजर राहण्याचे आदेश दिले. याचिकाकर्त्यांतर्फे निहालसिंग राठोड यांनी व विद्यापीठातर्फे आनंद परचुरे यांनी बाजू मांडली.

सांगा, आदेश कुणी दिला?

वरिष्ठांच्या आदेशानुसार कारवाई करण्यात आल्याचे डॉ. कथेरिया यांनी न्यायालयाला सांगितले. यावर न्यायालयाने तुम्हाला आदेश देणाऱ्या व्यक्तीचे नावा सांगा, नाही तर आम्ही तुमच्यावर अवमाननेचा खटला चालवू असा इशारा दिला.

नियमानुसार विद्यार्थ्यावर कारवाई केली असल्याचा युक्तिवाद करत अवमाननेचा खटला दाखल करू नये, अशी विनंती वारंवार कुलसचिवांनी न्यायालयाला केली. मात्र न्यायालयाने याप्रकरणी मवाळपणा दाखविण्यास नकार देत मंगळवारी सकाळी अवमाननेच्या खटल्यावर निर्णय सुनावणार असल्याचे सांगितले.

## शहर भागातील रस्त्यांच्या कामाला अखेर गती

**मुंबई :** रखडल्या शहर भागातील रस्ते काँक्रिटीकरणाच्या कामासाठी अखेर दोन कंत्राटदार पुढे आले असून लवकरच निविदा उघडल्या जाणार आहेत. त्यानंतर पात्र कंत्राटदाराची निवड होईल. मात्र प्रत्यक्ष कामांना पावसाळ्यानंतर , साधारणपणे ऑक्टोबर महिन्यात सुरुवात होईल. पावसाळ्यात काँक्रिटीकरणाची कामे करू नयेत, असा स्पष्ट आदेश आयुक्तांनी दिला आहे.

वाद -विवाद आणि आरोप प्रत्यारोपांमुळे शहर भागातील रस्त्यांची कामे चर्चेत आली होती. या कामाची रखडपट्टी झाल्याने आदित्य ठाकरे यांनी थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरच निशाणा साधला होता. या कामाचे कंत्राट मे . रोडवे सोल्युशन इन्फ्रा प्रा.ली. या कंपनीला मिळाले होते. कार्यादेश मिळूनही कंत्राटदाराने वर्षभर कामाला सुरुवातच केली नव्हती. त्यामुळे बराच गदारोळ झाला होता. अखेर ६४ कोटी रुपयांचा दंड ठोठावत पालिकेने कंत्राटदाराचे कंत्राट रद्द केले. त्यानंतर पुन्हा निविदा मागवण्यात आल्या.

## मोटरसायकलला अपघात जयसिंगपूर येथील अक्षय



**शिरोळ :** जयसिंगपूर येथील बाहुबली कोथळी यांचे त्रिकोणी आणि सुशिक्षित कुटुंब. मुलगा सिद्धार्थ उर्फ अक्षय लंडनमध्ये शिक्षण आणि नोकरी करून परतल्यानंतर सोमवारी तो पुण्याला नव्या नोकरीवर हजर होणार होता. रविवारी पुण्याला जात असताना काळाने कोथळी कुटुंबावर घाला घातला. मुलगा अक्षयने मोटरसायकल अपघातानंतर वडिलांच्या मांडीवर आणि आईच्या डोळ्यासमोरच जीव सोडल्याने कोथळी पती-पत्नीला बसलेला मानसिक धक्का उपस्थितांच्याही काळजाचा ठोका चुकवणारा ठरला.

मूळचे अकिवाट (ता. शिरोळ) येथील बाहुबली मल्लाप्पा कोथळी गेल्या अनेक वर्षांपासून जयसिंगपूरमधील हेरवाड कॉलनीत वास्तव्यास आहेत. त्यांचा मुलगा एम.एस. करण्यासाठी लंडनला गेला. काही काळ तिथेच त्यांनी नोकरीही केली. पण त्याच्या लग्नाचीही तयारी कुटुंबीयांकडून सुरू होती. त्यामुळे पुण्यात खाजगी

## शाहुवाडी : पन्हाळा मतदारसंघात ७१ टक्के मतदान

**राजदंड न्युज नेटवर्क**

**पन्हाळा :** लोकसभेच्या हातकणगले मतदार संघात येणाऱ्या पन्हाळा तालुक्यातील १लाख ३९ हजार ३७७ मतदारांसाठी एकूण १४६ मतदानकेंद्रावर मतदान पार पडले. आज पर्यंतच्या इतिहासातील हि पहिलीच लोकांसाभा निवडणूक गटातटाच्या पातळीवर लढली गेल्याने मतदानाचा टक्का वाढला आहे. पण सुरवाती पासूनच ग्रामीणभागात उत्साहाने मतदार मतदानास बाहेर पडले होते. तर सुर्वातीला शहरीभागातील मतदारांमध्ये तितकासा उत्साह दिसत नव्हता पण दुपारनंतर तेथेही रांगा दिसू लागल्या त्यामुळे पन्हाळा तालुक्यात सर्वत्रच मतदानात चांगला प्रतिसाद मिळत असलेचे चित्र होते.

लोकसभेच्या हातकणगले मतदार संघात २८ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. पण खरी लढत हि धैर्यशील माने,सत्यजित पाटील व राजु शेट्टी या तिघातच होताना दिसत आहे. हि निवडणूक प्रत्येक ठिकाणी वेगवेगळ्या मुद्द्यावर लढली गेली. पन्हाळा तालुक्यात सुरवातीला स्थानिक उमेदवार व पक्षफुटीची सहानभूती मिळवण्याचा प्रयत्न या मुद्द्यावरून झालेल्या आरोप प्रत्यारोपाने निवडणुकिला रंगत आली होती.पण जसजशी मतदानाची तारीख जवळ येत गेली तसतसे निवडणुकीतील प्रचाराचे मुद्दे बदलत गेले.जरी मुद्दे बदलत गेले तरी मुळचे मुद्दे मात्र प्रचारात कायम राहिले होते.

आत्तापर्यंत लोकसभा निवडणूक हि वरिष्ठ नेत्यांच्या सुचने वरूनच होताना दिसत होती.मात्र पहिल्यांदाच आत्ताची खासदारकीची निवडणूक गटातटाच्या पातळीवर आलेची दिसून आली.तिचा हा प्रवास जाती धार्मा वरून स्थानिक आमदारांचे मार्गे गाव पतीळीवरील गटातटा पर्यत पोहोचला.त्यातच सोशल मिडीयाचाही मोठ्या प्रमाणात वापर झाला.त्यातून अगदी ग्रामपंचायत सदस्या पासून थेट देशाच्या पंतप्रधानाच्या कामाच्या लेखाजोखा मांडला गेला.व त्यावरून समर्थक व विरोधक यांच्यात वैचारिक मतभेद पाहायला मिळाले.त्यातच पन्हाळा शाहुवाडीचे विध्यामान आमदार डॉ.विनय कोरे प्रचारात सक्रीय झाले. व जनसुराज्य पक्षाचा बाले किल्ला असलेल्या पन्हाळ्यात चुरस वाढत गेली. त्यांनी हि निवडणूक प्रतिष्ठेची बनवली व तश्या कार्यकर्त्यांना सूचना दिल्या. त्यामुळे पन्हाळा तालुक्यातील गावागावात मतदानाला उस्फुर्त मिळत गेला.

**शाहुवाडी विधानसभा मतदार संघाची मतदान टक्केवारी**

**सकाळी ९ वाजता... ६.२१ टक्के**
**दुपारी ११ वाजता... १७.१६ टक्के**
**दुपारी १ वाजता...३५.४८ टक्के**
**दुपारी ३ वाजता...५२.१३ टक्के**
**सायंकाळी ५ वाजता...६८.०० टक्के**
**अंतीम मतदान ७१ टक्के**

पन्हाळा तालुका हा लोकसभेच्या कोल्हापूर व हातकणगले या दोन मतदार संघात विभागाला आहे.त्यामुळे पन्हाळा तालूक्यातील जनसुराज्य पक्षाच्या भूमिके मुळे फक्त हातकणगलेचा नाही तर कोल्हापूर मतदार संघातहि मतदानात परिणाम दिसणार आहे.त्यामुळे त्याही मतदार संघात मतदानाची टक्केवारी वाढणार आहे यात शंका नाही.या वाढणाऱ्या टक्केवारीचा फायदा नेमका कोणाच्या पथ्यावर पडणार हे निकालानंतरच समजणार आहे.

**शासनाच्या चुकीमुळे मतदार राहिले मतदान पासून वंचित**

**पन्हाळा पोहाळे तर्फ बोरगाव येथील एका मतदान केंद्रावरील तब्बल २६ व तुरुकवाडी येथील एका नव मतदारांच्या नावांपुढे डीलीट शिक्का बसल्या मुळे तर काही नव मतदारांची नावे शेजारच्या गावातील मतदार यादीत नोंद झाल्या मुळे ते सर्वजण मतदान पासून वंचित राहिले**

## कोल्हापुरातील नेत्यांनी बजावला मतदानाचा हक्क

**कोल्हापूर :** लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यातील मतदानादिवशी कोल्हापूर आणि हातकणंगले मतदारसंघात चुरसीनेमतदानसुरु आहे. या दोन्ही मतदारसंघातील उमेदवारांनी आणि राजकीय नेत्यांनीही आपला मतदानाचा हक्क सकाळच्या टप्प्यातच मतदान करुन पार पाडला.

कोल्हापुरात काँग्रेसचे उमेदवार शाहू महाराजांनी आणि छत्रपती घराण्याने रमणमळा परिसरातील न्यू पॅलेसजवळील शाळेतील मतदान केंद्रात मतदानाचा हक्क बजावला. याज्ञसेनीराजे, माजी खासदार संभाजीराजे, माजी आमदार मालोजीराजे, मधुरिमाराजे,



यशराजे, यशस्विनीराजे यांनीमतदान केले.

महायुतीचे उमेदवार प्रा. संजय मंडलिक यांनी सहकुटूंब कागल तालुक्यातील चिमगाव येथील मतदान केंद्रात मतदान केले. यावेळी वैशाली मंडलिक, वीरेंद्र मंडलिक यांनीही मतदान केले. पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी कागल तालुक्यातील लिंगनूर दुमाला येथे मतदान केले. खासदार धनंजय महाडिक आणि परिवाराने कोल्हापुरात शाहू मार्केट यार्ड परिसरातील शेतकरी संघाच्या इमारतीत मतदान केले.अपक्ष उमेदवार बाजीराव खाडे यांनी करवीर तालुक्यातील सांगरुळ येथे मतदान केले.

तर माजी पालकमंत्री आमदार सतेज पाटील आणि आमदार ऋतुराज पाटील यांनी कसबा बावडा येथील पॅव्हेलियन येथील केंद्रात मतदानाचा हक्क बजावला. माजी आमदार संजयबाबा घाटगे यांनी कागल तालुक्यातील व्हनाळी येथे मतदान केले. आमदार जयश्री जाधव आर्यविन ख्रिश्चन येथील मतदान केंद्रावर मतदानाचा हक्क बजावला. त्यांच्यासोबत त्यांच्या सासूबाई प्रेमला पंडितराव जाधव यांनीही वयाच्या ९३ वर्षी मतदानाचा हक्क बजावला.

हातकणंगले लोकसभा मतदारसंघातमहायुतीचे उमेदवार धैर्यशील माने यांनी सकाळीच हातकणंगले तालुक्यातील रुकडी येथील मतदान केंद्रात तर उध्दव सेनेचे उमेदवार सत्यजित आबा पाटील यांनी शाहुवाडी तालुक्यातील सरुड येथे मतदान केले. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उमेदवार माजी खासदार राजू शेट्टी यांनी शिरोळ मतदारसंघात मतदान केले. तत्पर्वी त्यांनी त्यांच्या ९८ वर्षांच्या वृध्द आईचा आशिर्वाद घेतला.

## गारपीटीसह अवकाळी पावसाचे थैमान

**नागपूर :** वेधशाळेच्या अंदाजानुसार मंगळवारी सायंकाळच्या सुमारात जोराच्या वादळासह झालेल्या अवकाळी पावसाने नागपूर जिल्ह्यात चांगलेच थैमान घातले. अनेक भागात गारपीट झाली. भिवापूर तालुक्यात एक बैलजोडी व रामटेक तालुक्यात एक बैल विज पडून ठार झाला. नागपूर शहरातही जोरदार वादळाने अनेक भागातील झाडे उन्मळून पडली, होर्डिंग फाटले, विजेचे तार तुटले व टीनही उडाले.

हवामान विभागाचा अंदाज मंगळवारी खरा ठरला. आठवडाभर नागरिक उन्हाने होरपळल्यानंतर मंगळवारी पहाटे वातावरणाने कुस बदलली. पहाटे ३ वाजतापासून वादळासह हलक्या पावसाने हजेरी लावली. सकाळपासून मात्र ढगांच्या उपस्थितीत पुन्हा सूर्याचा ताप वाढला. दुपारपर्यंत उन-सावलीचा खेळ सुरू राहिला. दुपारी ३ वाजतापासून वातावरण पुन्हा बदलले. रामटेक तालुक्यात ३.३० वाजतापासून ढगांचा गडगडाटासह जोराचे वादळ सुरू झाले. मौदा तालुक्यातही वादळासह अर्धा-पाऊन तास गारपीटीसह पावसाच्या सरी बरसल्या. भिवापूर तालुक्यात वादळी पावसाचा तडाखा बसला. पांजरेपार गणपत लांबट या शेतकऱ्याच्या शिवारात चार बैल व गायी बांधून होत्या. अचानक वीज पडल्याने त्यातील दोन बैल ठार झाले. दुसरीकडे खातखेडा येथे वीज पडून एक म्हैस मृत्युमुखी पडली व एक बैल जखमी झाला. दुसरीकडे रामटेक तालुक्यात मांगली शिवारात वीज पडल्याने एका बैलाचा मृत्यु झाला.

पावसासह आलेले सोसाट्याचे वादळ इतके वेगात होते की त्यामुळे अनेक भागातील झाडे उन्मळून पडली. नागपूर शहरात सिव्हिल लाईन्स व गंजीपेठ येथे झाडे कोसळली. अनेक ठिकाणी झोपड्यांच्या छतावरील टीन उडल्याच्याही घटना घडल्या. होर्डिंगवरचे टीन व कपड्याचे बॅनरही फाटून हवेत उडाले, ज्यामुळे विजेची तारे तुटल्याने काही भागातील विज पुरवठा बंद पडला. उत्तर व पूर्व नागपुरात गाराही पडल्या.

सायंकाळी कार्यालयीन सुटीच्या वेळी झालेल्या या वादळी पावसाने चाकरमान्यांची भलतीच तारांबळ उडाली. वादळामुळे दुचाकी वाहनांचे संतुलन बिघडल्याने वाहनचालक पडल्याची माहिती समोर आली आहे. मेघगर्जना व विजांच्या कडकडाटाने भीतीदायक स्थिती झाली होती. सायंकाळच्या पावसाने दिवसभराच्या उकाड्यापासून काहीसा दिलासा नागरिकांना मिळाला.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# नव्या भारतात लोकशाही धोक्यात : डॉ. शशी थरूर

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** आताचा भारत आपल्या पूर्वजांनी स्थापन केलेला नाही. आपल्या देशातले या पूर्वीचे सरकार कोणाची पूजा करावी, काय खावे, काय घालावे हे सांगत नाही. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नव्या भारतामुळे जुन्या भारतातील सामाजिक एकोपा, मूल्य आणि इतर चांगल्या गोष्टी नष्ट होत आहेत. संविधानीक तरतूदी बदलल्या जात आहेत. यामुळे देशाची लोकशाही धोक्यात आली असून देशातील लोकांना 'मोदींची गॅरंटी' नव्हे तर 'लोकशाहीची गॅरंटी' हवी आहे, अशी टीका काँग्रेस नेते व माजी केंद्रीय मंत्री डॉ. शशी थरूर यांनी पुण्यात केली.



पुणे लोकसभा मतदार संघाचे महाविकास आघाडी, इंडीया फ्रंटचे उमेदवार रविंद्र धंगेकर यांच्या जाहीरनाम्याचे प्रकाशन सोमवारी काँग्रेस भवनमध्ये डॉ. शशी थरुर यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. ' निरोगी, आनंदी, सुरक्षित पुण्यासाठी – माझा शब्द.' असे जहर नामयाचे वैशिष्ट्य पूर्ण नाव ठाव्ऱ्यात आले आहे. याप्रसंगी धंगेकर यांच्यासह माजी गृहमंत्री अनिल देशमुख, माजी राज्यमंत्री रमेश बागवे, माजी आमदार उल्हास पवार, प्रचार प्रमुख मोहन जोशी, अ. भा. काँग्रेस कमिटीचे प्रभारी आशिष दुआ, अभय छाजेड, अंकुश काकडे, गजानन थरकुडे, गोपाळ तिवारी, राज अंबिके आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

डॉ. थरूर म्हणाले, सरकारकडून केंद्रीय तपास यंत्रणांचा गैरवापर केला जात आहे. त्यामुळे जनतेच्या मनात सत्ताधारी भाजप विरोधात रोष आहे. त्यामुळे चारशे पार तर सोडाच ३०० सुद्धा पार होणार नाही. काँग्रेसने ६० वर्षात जनतेचे काहीही हिसकावून घेतले नाही. अनेक उद्योगांनी त्यांचे मुख्य कार्यालय परदेशातील दुबई सारख्या शहरात हलवले आहे. यंत्रणांचा वापर करून दबाव टाकला जातो. कर चुकवणारे देशभक्त होतात आणि सर्वसामान्य अँटी नॅशनल होतात.

मोदींनी ३४५ वर्षापूर्वीच्या औरंगजेबावर बोलण्यापेक्षा गेल्या १० वर्षात काय काम केले यावर बोलावे. काँग्रेसच्या न्याय पत्रामध्ये कुठेही मुस्लिम धर्माचा उल्लेख नाही, असे असताना नरेंद्र मोदी व भाजप नेते कोणत्या आधारावर बोलतात कळत नाही. निवडणूक रोख्यांबाबत मोदी सरकार माहिती दंडवत होते. मात्र सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामुळे मोदी सरकार उघडे पडले. त्यांनी निवडणूक रोख्यांतून स्वतः खाल्ले आणि इतरांना खऊ घातल्याची टीका डॉ. थरुर यांनी केली.

वायनाडमधून राहुल गांधी मोठ्या मताधिक्याने विजयी होतील. तसेच उत्तर प्रदेशात काँग्रेसला आम्ही तुमच्याबरोबर आहोत हा संदेश द्यायचा आहे. रायबरेली लोकसभा १९५९ पासून काँग्रेस लढवत आहे. सोनिया गांधी राज्यसभेवर गेल्यामुळे काँग्रेसने ही जागा लढवणे आवश्यक होते. त्यामुळे राहुल गांधी यांनी जनतेसोबत असल्याचे दाखवत रायबरेलीतून उमेदवारी अर्ज भरला आहे. पंतप्रधान पदाबाबत थरुर म्हणाले, निवडणुकीनंतर इंडीया आघाडीचे नेते एकत्र बसून निर्णय घेतील. महाराष्ट्रात महाविकास आघाडीतील सर्व घटकपक्षात एकोपा असून आघाडीच्या जागा महाराष्ट्रात वाढतील, आसा विश्वासही डॉ. थरुर यांनी व्यक्त केला.

धंगेकर म्हणाले, की सार्वजनिक वाहतूक, ज्येष्ठ नागरिक, आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, सांस्कृतिक आणि पर्यटन, श्रमिक आणि असंघटित कामकार या घटकांचा जाहीरनाम्यात समावेश आहे.

**“ करकरेंच्या मृत्यूची चौकशी झाली पाहिजे!**

**शहीद हेमंत करकरे यांचा मृत्यू कसाबच्या गोळीने झालेला नाही, असे वक्तव्य विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केले. त्यावर विचारलेल्या प्रश्नावर थरूर म्हणाले, यामध्ये नेमके तथ्य काय आहे, हे मला माहीत नाही. माजी पोलिस अधिकारी एस.एम. मुश्रीफ यांच्या पुस्तकात तसा उल्लेख आला आहे. त्यामुळे हे गंभीर प्रकरण आहे. करकरे आणि माझे चांगले संबंध होते. त्यामुळे या प्रकरणाची त्रयस्थ संस्थेमार्फत चौकशी झाली पाहिजे. जे काय खरे आहे, ते समोर आले पाहिजे, असेही डॉ. थरूर म्हणाले.**

# आचारसंहितेत अडकला 'आनंदाचा शिधा'

**मुंबई / रमेश औताडे**

हातावर पोट असणाऱ्यांनी रोज कमवायचे व रोजचा उदरनिर्वाह करायचा असे असताना शिधावाटप दुकानाचा आधार होता.पोटाची खळगी भरताना सरकारने दिलेले खराब का असेना ते खाऊन तृप्तीची ढेकर देणारा मेरा भारत महान असे म्हणणारा गरीब नागरीक आनंदी असायचा. मात्र त्याचा आनंद मात्र निवडणुकीमुळे लुप्त झाला आहे. शिधावाटप अधिकारी म्हणतात की, निवडणुकीनंतर '' आनंदाचा शिधा '' मिळेल. गुढीपाडवा तरी गोड होईल या आशेवर चार पाच चकरा शिधा दुकानावर मारून आलेले शिधा ग्राहक मात्र भर उन्हाळ्यात शिधा न मिळाल्याने नाराज झाले आहेत.




गुढीपाडवा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचे औचित्य साधून राज्य सरकारने शिधापत्रिका धारकांना '' आनंदाचा शिधा '' देण्याची घोषणा केली होती. गुढीपाडवा व डॉ. आंबेडकर जयंती साजरी केली, मात्र शिधा मिळाला नाही. आता निवडणूक आहे, त्यामुळे शिधा वाटप नाही. शंभर रुपयांत शिधा अशी जाहिरात करण्यासाठी सरकारने करोडो रुपये खर्च करून आपलीच पाठ थोपटली. त्यानंतर साडी वाटप सुरू केले. फाटक्या साड्या देऊन गरिबांची चेष्टा केली, अशी प्रतिक्रिया शिधापत्रिका धारक देत आहेत.

मतदार राजा हा निवडणुकीत उमेदवारांच्या मागे मोफत वडापाव व पाणी पित भिकाऱ्यासारखा फिरत आहे. त्याला किमान शिधा तरी द्या, अशी मागणी होत आहे. आज भूक लागली आहे निवडणूक झाल्यावर सोने जरी दिले तरी त्याने भूक शमणार आहे का? असा संतप्त सवाल गरीब जनता करत आहे. त्यामुळे आनंदाचा शिधा मिळत नसल्याने मतदारराजा आनंदी नाही.

# 'शेजारील जिल्ह्यातील मतदानावर प्रभाव पाडण्याकरीताच' पंतप्रधानांच्या सभांचा घाट

## महाराष्ट्रात प्रथमच ५ टप्प्यात मतदान षड्यंत्र : काँग्रेस प्रवक्ते गोपाळ तिवारी

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** आजपर्यंत एवढ्या जास्त टप्प्यात कधीही न झालेले मतदानाचे टप्पे महाराष्ट्रात ४८ जागांसाठी ५ टप्प्यात मतदान(?) या निवडणुक आयोगाच्या निर्णयाचे गौडबंगाल, पंतप्रधानांच्या प्रचार सभांच्या नियोजनावरून स्पष्ट होत असल्साचा आरोप काँग्रेस राज्य प्रवक्ते गोपाळ तिवारी यांनी केला.

'महाराष्ट्रातील विरोधक' संपुष्टात आणण्याच्या लोकशाही विरोधी कुहेतूने, कट-कारस्थानाने केलेल्या सरकार पाडापाडीच्या राजकारणामुळे, राज्यात मोदी सरकारच्या पाया खालची वाळू सरकू लागली आहे. त्याची प्रचिती वारंवार येत असून, वणवण फीरत भाषणजीवी मोदींना महाराष्ट्रात ऊद्या १३ वी जाहीर सभा घेण्याची वेळ येणे, हे पराभवाचे द्योतक आहे.



काही कि. मी. वरील पुणे जिल्ह्यातील (बारामती) मतदार संघात ऊद्या निवडणुकीचे मतदान होत असतांनाच, शेजारील नगर जिल्ह्यात मात्र पंतप्रधान मोदींची जाहीर सभा होणे हे मतदानावर व मतदारांवर प्रभाव पाडणार कृत्य होत नाही काय (?) हे निवडणुक आयोगास नसमजणे एवढे निवडणुक आयोग अनभिक्षीक्त वा दुधखुळे आहे काय(?) असा संतप्त सवाल देखील काँग्रेस राज्य प्रवक्ते गोपाळ तिवारी यांनी केला.

त्यांनी पुढे सांगितले की, संविधानिक लोकशाही मार्गाने निवडणुका निकोप वातावरणात घेणे हे स्वायत्त असलेल्या निवडणुक आयोगावर बंधनकारक आहे तसेच 'लोकशाहीची बूज राखणे' हे देखील लोकशाहीचा १ ला स्तंभ असलेल्या व जनतेच्या कररुपी पैशातून उच्च स्तरीय पगार व सोई सुविधा घेणाऱ्या (खअड खझड) या प्रशासकीय अधिकाऱ्यांवर तेवढेच अवलंबून आहे. मात्र, अनेक प्रशासकीय अधिकारी वर्ग सत्ताधिशांच्या कुटील कारस्थानांना बळी पडून, त्यांचे ईशाऱ्यावर नाचत असल्याचे व संविधानिक निति नियम पायदळी तुडवत असल्याचे दिसून येत आहे.

काँग्रेस सत्तेत आल्यावर अशा संविधानीक नियम - संकेत डावलून काम करणाऱ्या अधिकार्यांची निश्चित कायदेशीर नोंद घेईल, असा सज्जड ईशारा देखील गोपाळ तिवारी यांनी दिलेल्या प्रसिध्दी निवेदनात दिला.

# मोदी सरकारच्या शैक्षणिक आणि युवक धोरणांमुळे मोदींनाच मतदान होणार : राजेश पांडे

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** एनडीए सरकारने राष्ट्रीय शिक्षण धोरणामध्ये अमुलाग्र बदल केले आहेत. राष्ट्रीय शिक्षण धोरणामध्ये कौशल्य विकास शिक्षणावर भर देण्यात आला असून पहिल्यांदाच पुर्व प्राथमिक शिक्षणाचा समावेश धोरणात करण्यात आला आहे. युवकांना दोन पदव्या घेता येणार असल्यामुळे कुशल मनुष्यबळाची निर्मिती मोठ्याप्रमाणात होणार आहे. युवकांचे हित पंतप्रधान नरेंद्र मोदी हेच करु शकतात. पुणे हे ऑक्सफर्ड आणि ईस्ट नावाने ओळखले जाते. शिक्षण क्षेत्रातील क्रांतीकारक निर्णयामुळे पुण्यामध्ये भाजपच्या उमेदवाराला म्हणजेच मोदींना मतदान करतील, असा विश्वास प्रदेश भाजपचे उपाध्यक्ष राजेश पांडे यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

यावेळी पुणे लोकसभेचे प्रभारी श्रीनाथ भिमाले, भाजपचे शहर उपाध्यक्ष शाम देशपांडे, प्रशांत हरसुले लहुली क्रांती सेनेचे नितीन वायदंडे, प्रदेश प्रवक्ते संजय मयेकर आणि हेमंत लेले उपस्थित होते.

पांडे म्हणाले, पुणे हे शिक्षणाचे माहेरघर आहे. आयटी हब आहे. मोदी सरकारने युवकांना केंद्रस्थानी ठेवून अनेक महत्वपुर्ण निर्णय घेतले. यामुळे उद्योगाला चालना मिळाली आहे. पुण्यात अनेक स्टार्टअप सुरु झाले. मोदी सरकारच्या स्टार्टअप इंडिया, सँडअप इंडिया आणि मेक इन इंडिया, पीएमईजीपी सारख्या योजनांमुळे नवीन संशोधनाला आणि उपक्रमांना चालना मिळाली आहे. राज्य सरकारने सर्व जिल्हयांमध्ये योजगार मेळावे आयोजित केल्यामुळे मोठ्या प्रमाणात युवकांना नोकर्या मिळाल्या. २०१४ ते २०१९ आणि २०२१ ते २०२३ या कालावधीत, राज्य सरकारने वेगवेगळ्या जिल्हयांमधये १ हजार ४७३ रोजगार मेळावे घेतले. यामध्ये अडीच लाख कर्मचार्यांच्या भरतीसाठी १३ हजार उद्योजकांना बोलावण्यात आले होते. राज्य सरकार विविध विभागांमध्ये ७२ हजार पदे लवकरच भरणार आहे. मोदी सरकारने दीनदयाळ उपाध्याय ग्रामिण कौशल्य योजना, पंतप्रधान कौशल्य विकास योजनांसारख्या प्रमुख औदयोगिक आणि व्यावसायिक कौशल्या देणार्या योजना आणल्या आहेत. राज्यातील ३४ ग्रामिण जिल्हयांमध्ये प्रमोद महाजन कौशल्य विकास केंद्राची सुरुवात करण्यात आली असल्याचे पांडे यांनी सांगितले.

मोदी सरकारने युवक कल्याण आणि क्रिडा मंत्रालयासाठी अर्थसंकल्पात भरीव तरतुद केली आहे. मुद्रा योजना,पंतप्रधान स्वनिधी योजना यामुळे २०१४ पासून उद्योगांमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा झाल्या . मुद्रा योजनेचा लाभ ३ कोटी ७४ लाख लाभार्थ्यांना झाला आहे. यामध्ये २० टक्के अनुसुचित जाती आणि जमातीमधील नागरिक आहेत. पीएम स्वनिधी योजनेअंतर्गत राज्यात ७ लाख ६५ हजार पथविक्रेत्यांना आर्थिक मदत मिळाली. यामध्ये महिल्यांचे प्रमाण ४४ टक्के इतके आहे. आदिवासी विद्यार्थ्यांसाठी एकलव्य मॉडेल शाळा सुरु करण्यात आल्या. उच्च शिक्षण घेणार्या विद्यार्थ्यांसाठी नवीन वैद्यकीय महाविद्यालये, आयआयटी, आयआयएम आणि विद्यापीठे सुरु करण्यात आली. मोदी सरकारच्या काळात पाच हजार नवीन आयटीआय स्थापन करण्यात आले असल्याचे पांडे यांनी सांगितले.

### प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यात राज ठाकरे, फडणवीस, अजित पवार यांच्या पुण्यात सभा

**महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांच्या प्रचारासाठी ४ मे पासून घर चलो अभियान सुरु करण्यात आले आहे. साडेसात हजार कार्यकर्ते घरोघरी जावून प्रचार करत आहेत. मनसेचे पक्षप्रमुख राज ठाकरे, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, महिला प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांच्या सभांचे आणि दौर्याचे नियोजन ८ ते ११ मे दरम्यान करण्यात आले असल्याचे राजेश पांडे यांनी सांगितले.**

# सामान्यांना गुलाम करून संविधान बदलण्याची तयारी सुरू आहे - तुषार गांधी

**मुंबई / प्रतिनिधी**

सामान्य माणसाला गुलाम केले आहेच.आता संविधान बदलण्याचे काम सुरू आहे. लोकशाही धोक्यात आली आहे. त्यामुळे मतदारांनी गांभीर्याने विचार करावा.असे आवाहन महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी यांनी मंगळवारी मुंबई मराठी पत्रकार संघ येथे आयोजित पत्रकार परिषदेत केले.

अनेक सामाजिक संस्थांच्या कार्यकर्त्यांनी '' आम्ही भारतीय '' या समूहाच्या वतीने पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. यावेळी ,पोलिस समन्वय समितीचे डोल्फी डिसुझा, समाजसेवक शरद कदम, रिपाई नेते शाम दादा गायकवाड, अर्जुन डांगळे, तिस्टा सटेलवाड,फिरोज मिठीबोरवाला, इरफान इंजिनिअर, आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बनविलेल्या संविधानाची मोडतोड करण्याचे काम २०१४ पासून सुरू झाले तर २०१९ पासून हे भारतीय संविधान उद्ध्वस्त करण्याच्या कामाला वेग आलेला आहे. राक्षसी बहुमत त्यासाठी त्यांना हवे आहे. त्यांचे नेते उघडपणे संविधान बदलण्याची भाषा बोलत आहेत असे तुषार गांधी म्हणाले.

लोकशाहीच्या रक्षणासाठी बनविण्यात आलेल्या अधिकतर संस्था कमजोर केल्या जात आहेत म्हणून २०२४ ची निवडणूक ही संविधान आणि लोकशाही तसेच लोकशाही मधील अधिकार वाचवण्याची निवडणूक आहे. या देशात लोकशाही राहणार की हुकूमशाही राजवट येणार याचा फैसला या निवडणुकीत होणार आहे असे तिस्टा सटेलवाड म्हणाल्या.

लोकशाहीच्या बाजूने उभे राहण्या ऐवजी इथला काही भांडवलदारी मीडिया सरकारच्या नादाला लागलाआहे. काही प्रकरणात केंद्र सरकार सुप्रीम कोर्टावर दबाव आणत आहेत. निवडणूक आयोग सत्ताधारी पक्षाला अनुकूल भूमिका बजावत आहे. राज्यपाल सत्ताधारी पक्षासाठी काम करीत आहेत. इडी,



सीबीआय, इन्कम टॅक्स या सरकारी संस्था सत्ताधाऱ्यांच्या कार्यकर्त्या प्रमाणे काम करीत आहेत. विरोधकांना नामशेष करण्यासाठी आणि नागरिकांना वेठीस धरण्याकरीता या संस्थाचा उपयोग केला जात आहे.असे डोल्फी डिसुझा म्हणाले.

लोकांमध्ये द्वेष पसरविण्याचे काम केले जात आहे. लोकांच्या प्रश्नावर, महागाई, रोजगार, शिक्षण, विकासाच्या प्रश्नावर निवडणुका लढविण्या ऐवजी मंगळसूत्र, मुस्लिम, पाकिस्तान या विषयावर लोकांचे लक्ष वळविण्यात येत आहे. धर्मांधता, जातीयता आणि प्रांतवादावर भर दिला जात आहे. मुंबईत मराठी माणसाने नोकरी साठी अर्ज करू नये अशी जाहिरात असेल किंवा आमच्या सोसायटीत मराठी माणसाने घर घेऊ नये किंवा प्रचाराला येऊ नये असा भाषिकवाद जोपासला जात आहे.असे शाम दादा गायकवाड म्हणाले.

महाराष्ट्रात डॉ नरेंद्र दाभोलकर, कॉ गोविंद पानसरे यांच्या हत्येचा शोध लागलेला नाही अजूनही कोर्टात ते प्रकरण आहे. अनेक निरपराध नागरिक तुरुंगात खितपत पडलेले आहेत. शहरी आणि ग्रामीण भागात असंतोष आहे. शेतमालाला दाम नाही शेतकरी चिंतेत आहे. बेरोजगारांना काम नाही महागाई प्रचंड वाढलेली आहे. गॅस, पेट्रोल, डिझेल यांचे दर वाढत आहेत. जल, जंगल आणि जमीन यांची ही लढाई आहे. शहरातील मोल मजुरी करणारा कष्टकरी, इथला कोळी बांधव, आदिवासी आपली दररोजच्या जगण्याची लढाई लढत आहेत. इथली सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, मग ती रेल्वे असो किंवा बस व्यवस्था असो तिची चिंताजनक स्थिती आहे असे इरफान इंजिनिअर म्हणाले.

लोकांना गारेगार प्रवास नको तर सुस्थितीतील प्रवास हवा आहे. नियमित लोकल वाढवण्या ऐवजी एसी गाड्या वाढवल्या जात आहेत कोकणात प्रा. मधु दंडवते आणि जॉर्ज फर्नांडीस यांच्या मुळे रेल्वे मिळाली परंतु कोकणातील प्रवाशांना रेल्वे प्रवास सुखकर मिळू शकत नाही. मुंबई गोवा महामार्ग १३ वर्ष झाली तरी पूर्ण होवू शकला नाही या तेरा वर्षातील दहा वर्ष एकच माणूस रस्ते वाहतूक खात्याचा मंत्री आहे. या सर्व पार्श्वभूमीवर लोकशाही आणि संविधान वाचवण्यासाठी मोठ्या संख्येने मतदानाला उतरले पाहिजे असे आवाहन यावेळी '' आम्ही भारतीय '' या समूहाच्या वतीने करण्यात आले.

# मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची शुक्रवारी जाहीर सभा

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** लोकसभा मतदारसंघातील भाजप महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांच्या प्रचारार्थ महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची जाहीर सभा सारसबाग परिसरात येत्या शुक्रवारी (ता. १० मे) सायंकाळी ६ वाजता आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती मनसेचे नेते बाळा नांदगावकर यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.



त्या आधी सभेच्या नियोजनासाठी मनसे कार्यालयात भाजप आणि मनसेच्या नेत्यांची महत्त्वपूर्ण बैठक झाली. या बैठकीला मनसे नेते नितीन सरदेसाई, शिरीष सावंत, भाजप शहर अध्यक्ष धीरज घाटे, भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष राजेश पांडे, महायुतीचे समन्वयक संदीप खर्डेकर, मनसे शहर प्रमुख साईनाथ बाबर, किशोर शिंदे, गणेश सातपुते, हेमंत संभूस, अजय शिंदे, योगेश खैरे, जयराज लांडगे, बाळा शेडगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

नांदगावकर म्हणाले, पुणेकर मतदार विशेषतः युवक राज ठाकरे यांचे विचार ऐकण्यास उत्सुक असतो. मनसेला मानणारा मोठा मतदार पुणे लोकसभा मतदारसंघात आहे. मनसेचे सर्व कार्यकर्ते आणि पदाधिकारी मोहोळ यांच्या प्रचारात एकदिलाने उतरले आहेत. ही सभा यशस्वी करण्यासाठी आम्ही सर्व जण काम करत आहोत. सभेला उच्चांकी गर्दी होईल असा विश्वास आहे. सभास्थानी प्रत्यक्ष जाऊन पाहाणी केली आणि आढावा घेतला. वाहतुकीची कोंडी होणार नाही यासाठी प्रयत्न करीत आहोत.

# महाविकास आघाडीसाठी 'पुणे कँटोन्मेंट' निर्णायक ठरणार !

**थेट मुद्द्यावर... - प्रवीण पगारे**

**पुणे :** पुणे लोकसभा मतदारसंघात 'पुणे कँटोन्मेंट मतदारसंघ' निर्णायक ठरणार आहे. विशेष करून महाविकास आघाडीच्या बाजूने या मतदारसंघात कौल मिळणार असल्याचे चित्र आहे. त्यामुळे यंदा भाजपसाठी 'डेंजर झोन ' असलेला हा मतदारसंघ परिवर्तनास हातभार लावणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

पुणे लोकसभा मतदारसंघात यंदा मतांचे 'गणित' कोण कोणत्या विधानसभा मतदारसंघात फिसकटू शकते याचा आढावा घेतला तर यंदा भाजपच्या मतांमध्ये मोठ्या प्रमाणावर घसरण होणार आहे. मुख्यत्वे वडगावशेरी , पुणे कँटोन्मेंट या दोन विधानसभा मतदारसंघात सर्वाधिक फटका भाजपला बसण्याची चिन्हे आहे. इतकेच नाहीतर आगामी विधानसभा निवडणुकीतही परिवर्तन घडू शकते.अशी स्थिती आहे. त्यात सहाही विधानसभा मतदारसंघात मराठा आरक्षणाच्या प्रश्नामुळे मराठा समाजाची भूमिका ही महाविकास आघाडीच्या पथ्यावर पडू शकते.असे राजकीय अभ्यासकांचे ठाम मत आहे.

पुणे कँटोन्मेंट विधानसभा मतदारसंघात गत लोकसभा निवडणुकीत मिळालेले मतदान पाहता, महायुती पर्यायाने भाजपला ६७,१७७ तर महा विकास आघाडीला ५४,४४४ मते आणि वंचितला १४,६९९ व अन्य असे एकूण १,४०,३६४ मतदान झाले. यंदा या मतदारसंघात एकूण २ लाख ८० हजार ४०० मतदारांपैकी पुरुष १लाख ४३ हजार ०४५,महिला १लाख ३७ हजार ३२२ तर ३३ तृतीय पंथीय मतदार आहेत.सद्यस्थितीत इंडिया फ्रंटच्या एकीमुळे या मतदारसंघातही महाविकास आघाडी सरस ठरली आहे. गतवेळी मत विभाजनासाठी वंचित कारणीभूत ठरल्याची चर्चा जोरात झाली होती. मात्र भाजपची बी टीम म्हणून वंचितची प्रतिमा मलिन झाली आहे. त्यामुळे यंदा महायुतीच्या मतांचे समीकरण बिघडण्यास वंचितच कारणीभूत ठरणार आहे. त्यात एमआयएमही स्वतंत्रपणे रिंगणात असली तरी मुस्लिम समाजाची एकगठ्ठा मते महाविकास आघाडीच्या पारड्यात जाणार आहे. आंबेडकरी चळवळीचे तसेच मुस्लिम समाजाचे मतदान हे महाविकास आघाडीसाठी जमेचे ठरणार आहे. एकप्रकारे आंबेडकरी चळवळ आणि मुस्लीम समाजाच्या एक गठ्ठा मतांपासून भाजप यंदा 'वंचित' होऊ शकतो. त्यात २००९ नंतर भाजपने सलग हा विधानसभा मतदारसंघ ताब्यात ठेवला आहे. मात्र विद्यमान आमदार सुनील कांबळे हे केवळ ५ हजार १२ मताधिक्य घेऊन विजयी झाले होते.मात्र या पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघात काँग्रेसचे रमेश बागवे यांना दुसऱ्या क्रमांकाची ४७ हजार १४८ मते मिळाली होती. आता राजकीय स्थिती बदलेली आहे आणि त्यावरून मतदारांच्या भावना संतप्त आहे. त्यात माजी गृहराज्यमंत्री रमेश बागवे यांनी मतदारसंघ बांधणीवर लक्ष केंद्रीत केलेले आहे. त्यात सध्या महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांच्या प्रचाराचे काटेकोरपणे नियोजन त्यांनी केले आहे. माजी नगरसेवक अविनाश बागवे हेही मोदी सरकारच्या योजनांचा पंचनामा करत आहे.त्यात पुणे शहर काँग्रेसचे अध्यक्ष अरविंद शिंदे तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप हेही याच मतदारसंघातील असून त्यांनी जोरदार ताकद लावली आहे. त्यांच्यासाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची आहे. याचबरोबर काँग्रेसचे राष्ट्रीय नेते राहुल गांधी यांची सभा याच मतदारसंघात पार पडली आणि या सभेने संपूर्ण चित्र पालटले आहे. राहुल गांधी यांच्या सभेने मतदारांवर प्रभाव पडला आहे. त्यामुळे या मतदारसंघावर पुन्हा काँग्रेसला प्राबल्य मिळणार आहे. सद्यस्थितीत इंडिया फ्रंटमधील काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना ( उबाठा )आप व सर्व घटक पक्षांची बांधलेली मोट काँग्रेसच्या मतांचे समीकरण दृढ करेल असा ठाम विश्वास राजकीय अभ्यासकांचा आहे. प्रामुख्याने दाट लोकवस्ती असलेला हा मतदारसंघ संमिश्र आहे. कष्टकरी वर्गाचे मोठे प्रमाण आहे. वाढती महागाई हाच मुद्दा महायुतीला गारद करणार आहे. या मतदारसंघात स्व. गिरीश बापट यांना १२७३३ मतांचे मताधिक्य मिळाले होते. मात्र कसबा विधानसभा पोटनिवडणुकीत दारुण पराभव पत्करत बालेकिल्ला ही ओळख भाजपने जशी गमावली आहे.तशी भाजपमधील अंतर्गत दुफळीमुळे पुणे कॅन्टोन्मेंट मतदारसंघात लोकसभाच काय आगामी विधानसभा मतदारसंघाचे चित्र महाविकास आघाडीसाठी अनुकूल ठरणार आहे. विशेषतः राष्ट्रवादीच्या विभाजनाचा सर्वाधिक फटका हा या मतदारसंघात भाजपला बसणार आहे. त्यामागे स्थानिक पातळीवरील राजकीय महत्वाकांक्षा हे प्रमुख कारण आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे पदाधिकारी - कार्यकर्ते मनापासून सहभाग देतील का ? हा खरा प्रश्न आहे. त्यामुळे भाजपची या मतदारसंघावर पकड आता कमकुवत झाली आहे. त्यामुळे यंदाची लोकसभा निवडणूक महाविकास आघाडीला सहज खेचून आणता येईल.यासाठी हा मतदारसंघ निर्णायक ठरणार आहे.

# मडके फोडून अजित पवार गटाचा निवडणूक प्रचार

## पुरोगामी महाराष्ट्रात सर्व स्तरातून टीका

**मुंबई :** निवडणूक म्हटलं की साम दाम दंड भेद यांचा वापर अनेकदा झाल्याचं दिसून आलं आहे. त्यातच काही ठिकाणी मंत्रतंत्र किंवा अंद्धश्रद्धेला खतपाणी घालणारे प्रकारही पाहायला मिळाले आहेत. मात्र पुरोगामी महाराष्ट्रात या सगळ्याला नेहमीच विरोध होत आला आहे. बारामती लोकसभा मतदारसंघात अलिकडेच असा काही प्रकार दिसून आल्यानं सगळीकडेच संतापाची लाट आली आहे. अजित पवार यांच्या कार्यकर्त्यानं कोपरा सभेत मडकं फोडल्यानं त्याची चर्चा राज्यात रंगली आहे. वास्तविक बारामतीच्या लढतीकडे सगळ्या देशाचं लक्ष लागलं आहे. कारणही तसंच आहे. पवार कुटुंबातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून सुप्रिया सुळे आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून सुनेत्रा पवार यांच्यात थेट लढत नाही. तर ती लढत राजकारणातील चाणक्य ज्येष्ठ नेते शरद पवार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी अर्थात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अस्तित्वाची बनली आहे. त्यामुळे काका-पुतणे बारामतीत तळ ठोकून आहेत. त्यातच अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील पदाधिकाऱ्याने सभेत मडकं फोडल्यानं बारामती मतदार संघातील राजकीय वातावरण तापलं आहे. निवडणूक प्रचारात अशा प्रकारे मडकं फोडल्यामुळे पुरोगामी महाराष्ट्राच्या परंपरेला न शोभणारी कृती असल्यामुळे सगळ्याच स्तरातून टीका होताना दिसत आहे.

**नेमका काय घडला प्रकार :** बारामती लोकसभा मतदारसंघातील सुनेत्रा पवार यांच्या माळेगाव प्रचारसभेत रविराज तावरे यांनी लोकांसमोर मडकं फोडलं. असं करत असताना सुनेत्रा पवार विजयी झाल्या नाही तर पाणीप्रश्न निर्माण होईल. रविराज तावरे हा अजित पवार यांच्या नेतृखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा पदाधिकारी असल्याचं समोर येतं आहे. याबाबत रविराज तावरे यांनी आपण मडकं फोडलं नाही तर माठ म्हणेज कलश फोडल्याचं म्हटलं आहे. उलट आपलं आयुष्य पवार साहेबांना लागो असं रविराज तावरे यांनी म्हटलं आहे.

निवडणुकीत आणाभाकांची परंपरा - राज्यात अनेकदा असे प्रकार दिसून आले आहेत की, कुलदैवताच्या नावानं शपथ घ्यायला लावून मतदान करण्याचं साकडं घातलं जातं. गंडे-दोरेही बांधले जातात. एका निवडणुकीत कोकणात तर एका महिला उमेदवाराने त्यांच्या घरापासून ठराविक अंतरावर लिंबू पेरल्याचं सांगितलं होतं. निवडणूक जिंकण्यासाठी अशा क्लृप्त्या अनेकदा कार्यकर्ते आणि काहीवेळा नेते करत असतात. मात्र यातून अंद्धश्रद्धेला खतपाणी मिळतं. त्याला पुरोगामी महाराष्ट्रात नेहमीच विरोध होत आला आहे.

**वाण नाही पण गुण लागला - हेमंत देसाई :** महाराष्ट्र हा शाहू, फुले, आंबेडकर यांचा आहे, अशा प्रकारचा जप केला जातो; मात्र अनेक राजकीय पक्ष अंधश्रद्धा जोपासत असतात हे संपूर्ण महाराष्ट्रानं बघितलं आहे. जादूटोणाविरोधी कायदा मंजूर व्हावा यासाठी नरेंद्र दाभोलकर यांची अंधश्रद्धा निर्मूलन समिती आग्रही होती. त्यावेळेस या कायद्याविरोधात वेगवेगळ्या भ्रामक समजुती पसरवण्याचं काम अनेक राजकीय पक्षाकडून झालं. त्याचा परिणाम विधेयकाला विरोध करण्यात झाला. खूप प्रयत्नानंतर विधेयक दोन्ही सभागृहात मंजूर झालं. कायदा संमत झाला. प्रत्यक्षात मात्र अनेक बाबतीत महाराष्ट्रात या कायद्याची अंमलबजावणी होते का? याकडे बघितलं जात नाही. प्रचार सभेतून मडकं फोडणं हा प्रकार धक्कादायक आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी कायमच पुरोगामी विचारांचा पुरस्कार आणि प्रसार केलेला आहे. ते स्वतः शाहू, फुले, आंबेडकरांचे फक्त नाव घेतच नाहीत, तर त्यांच्या कृतीतून देखील जाणवतं. त्यांनी कधीही अंधश्रद्धेचा पुरस्कार केला नाही. अशाप्रकारे मडकं फोडणं म्हणजे एक अंधश्रद्धा आहे, असे विचार ज्येष्ठ राजकीय विषक हेमंत देसाई यांनी मांडले.

**हे तर माणुसकी सोडून जाण्यासारखं :** देसाई पुढे म्हणतात, मडकं फोडण्यासारख्या अंधश्रद्धांना शरद पवार यांनी विरोध केला आहे. त्यामुळे शरद पवार यांचे संस्कार, विचार घेतलेले उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तरी शाहू, फुले, आंबेडकर यांना आम्ही मानतो असं म्हटलय. आम्ही भाजपासोबत गेल्यानंतर आमचे विचार विलीन केले नसल्याचं अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षानं वारंवार सांगितलं आहे. मडकं फोडून दुसऱ्याचं वाईट व्हावं अशी कल्पना करणं म्हणजे नातेसंबंध आणि माणुसकीला सोडून जाणारं आहे. अजित पवार यांच्या पक्षाकडूनच असं होत असेल तर त्यांना भाजपाचा वाण नाही, पण गुण लागलेला आहे असं म्हणायला वाव आहे. आज निवडणुका असल्यामुळे वेगवेगळ्या पक्षांचे नेते देवदर्शनासाठी कोणी मंदिरात जातात तर कोणी यज्ञ, तप करतात. त्याला विरोध करायचं कारण नसलं तरी त्या नावाखाली अंधश्रद्धा पसरवयाचं काम केलं जात असेल तर त्याला राज्यातील वैचारिक लोकांनी जाहीरपणे विरोध केला पाहिजे, असं मतही हेमंत देसाई यांनी व्यक्त केलं आहे.

**संघर्षातून झाला कायदा :** सर्वात प्रथम ७ जुलै १९९५ रोजी मूळ मसुदा तयार करण्यात आला होता. त्यात २० वेळा दुरुस्ती करण्यात आली. त्यानंतर २००३ साली आवश्यक त्या दुरुस्ती करून जादूटोणा विरोधी कायदा प्रारूप विधानसभेत संमत झालं होतं. त्यानंतर महाराष्ट्र १५ ऑगस्ट २००३ साली अंधश्रद्धा निर्मूलन कायदा करणारं पहिलं राज्य ठरलं. महाराष्ट्र नरबळी अमानुष, अघोरी आणि अनिष्ट प्रथा व जादूटोणा प्रतिबंध तसंच त्याचे समूळ उच्चाटन करणारे विधेयक २०१३ हा कायदा २० डिसेंबर २०१३ रोजी लागू करण्यात आला.

# करकरेंचा मृत्यू पोलिसाच्या गोळीने?

## मुश्रीफांचे गौप्यस्फोट, उज्वल निकमांवरही आरोप



**मुंबई :** लोकसभा निवडणुकीत भाजपने उज्ज्वल निकम यांना उमेदवारी दिली. निकम यांना उमेदवारी दिल्यानंतर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी २६११ हल्ल्याच्या मुद्द्यावरून खळबळजनक आरोप केले. 'हेमंत करकरेंना लागलेली ती गोळी कसाबच्या बंदुकीतली नव्हती, कुठल्या अतिरेक्याची नव्हती. तर ती गोळी आरएसएस समर्पित एका पोलीस अधिकाऱ्याची होती. त्यावेळी ते पुरावे लपवणारा देशद्रोही कुणी असेल तर तो उज्वल निकम आहे', असा आरोप वडेट्टीवार यांनी केला. या वक्तव्यावरून वाद वाढल्यानंतर वडेट्टीवार यांनी सारवासारव करण्याचा प्रयत्न केला. 'एस एम मुश्रीफ यांनी जे पुस्तक लिहिलं आहे, त्या पुस्तकाचा दाखला घेऊन मी म्हटलं आहे,' असं वडेट्टीवार म्हणाले.

वरिष्ठ पोलिस अधिकारी हेमंत करकरे यांचा मृत्यू दहशतवादी अजमल कसाब याच्या गोळीने झाला नाही, असा दावा लेखक एस. एम. मुश्रीफ यांनी केला आहे. हू किल्ड करकरे या पुस्तकात त्यांनी केलेल्या या दाव्याने खळबळ उडाली. २६११ हल्ल्याची माहिती गुप्तचर यंत्रणांना एक आठवडा आधी मिळालेली होती, असा उल्लेखही या पुस्तकात करण्यात आला.

काय म्हणाले मुश्रीफ?

या पुस्तकातल्या आरोपांबाबत एस एम मुश्रीफ यांनी पुन्हा एकदा प्रतिक्रिया दिली आहे. 'माझ्या पुस्तकात यासंबंधी दोन पुरावे आहेत, एक फॉरेन्सिक सायन्सचा रिपोर्ट, ज्यात गोळ्यांसंदर्भातला रिपोर्ट आहे आणि कोर्टातला केसचा निकाल, या दोन गोष्टींच्या आधारावर माझं मत आहे. कोर्टाच्या जजमेंटमध्ये स्पष्ट म्हणलं आहे की करकरेंच्या शरिरात ज्या गोळ्या मिळाल्या त्या अजमल कसाब किंवा इस्माईल खान यांच्या रायफलम धून उडवलेल्या नव्हत्या. त्या जजमेंटमध्ये आणि फॉरेन्सिकच्या रिपोर्टमध्ये असंही म्हटलं आहे, पोस्टमॉर्टम रिपोर्टमध्ये करकरेंच्या बॉडीवर त्यांच्या मानेपासून ते खांद्याच्या दोन इंचाच्या भागापर्यंत रिव्हॉल्वरने पाच गोळ्या वरून खाली पोटात मारल्या आहेत. पाच गोळ्या मारल्या त्यातल्या तीन निघून गेल्या, दोन पोटातच राहिल्या, ज्यामुळे त्यांचा मृत्यू झाला', असा दावा मुश्रीफ यांनी केला आहे.

'या कुणाच्या गोळ्या होत्या? कारण पोस्टमॉर्टम रिपोर्ट त्यावेळी कोर्टासमोर होता. तो पोस्टमॉर्टम रिपोर्ट उज्ज्वल निकम यांच्याकडे होता. त्यांनी त्याचवेळी कोर्टाला विनंती करायला पाहिजे होती की त्यांनी तपास यंत्रणांना आदेश द्यावा, या गोळ्या कुणी मारल्या याची चौकशी करा. गोळ्या कुणी मारल्या हे त्यांना माहिती होतं, त्यामुळे त्यांना वाचवण्यासाठी त्यांनी तशी विनंती कोर्टाला केली नाही', असं मुश्रीफ म्हणाले.

'मागच्या तीन-चार वर्षात मी स्वतः याचा तपास केला. २०१९ पर्यत मी तपास केला आणि परिस्थितीजन्य पुरावा मी तयार केला, त्याच्यावरून संजय गोवीलकर नावाचे एक असिस्टंट पोलीस इन्सपेक्टर होते त्यांनी या गोळ्या मारल्या या निर्णयापर्यत मी आलो. याचा पुन्हा तपास व्हावा. तिघांच्याविरोधात गुन्हे दाखल व्हावेत. प्रभाकर आलोक ज्यांनी हल्ला होणार ही माहिती लपवून ठेवली. संजय गोवीलकर ज्यांनी या गोळ्या करकरेंना मारल्या आणि ही माहिती लपवणारे उज्ज्वल निकम, या तिघांवर गुन्हे दाखल व्हावेत', असे खळबळजनक आरोप मुश्रीफ यांनी केले आहेत.

'हा मुद्दा आता का उपस्थित झाला मला माहिती नाही. यात राजकारण असू शकेल, पण त्यामुळे काही चांगलं होत असेल तर बरं आहे ना. हा निवडणुकीचा मुद्दा नाहीये. निवडणूक झाली तरी हा मुद्दा चालू राहिला पाहिजे,

# नाशिकमध्ये मर्जीतल्या बिल्डरांच्या माध्यमातून ८०० कोटींचा घोटाळा

## संजय राऊत यांचा गंभीर आरोप

**नाशिक :** नाशिकमध्ये भूसंपादनाच्या नावाखाली ८०० कोटींचा घोटाळा झाल्याचा गंभीर आरोप शिवसेना ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी केला आहे. मर्जीतल्या बिल्डरांच्या माध्यमातून ८०० कोटींचा गैरव्यवहार झाला असून, हे सगळे बिल्डर मिंदे आणि कंपनीचे खास हस्तक आहेत असा आरोप राऊत यांनी केला आहे. बिल्डरांना भूसंपादनाच्या नावाखाली आठशे कोटी रुपयांची कशी खैरात केली याचा खुलासा करणार असल्याचा इशारा देखील राऊत यांनी दिला आहे.

नेमके काय आहेत राऊत यांचे आरोप

नाशिक महानगरपालिका हद्दीत नगर विकास खाते अंतर्गत भूसंपादन घोटाळा झाला आहे. या घोटाळ्यात आठशे कोटीचे गैरव्यवहार झाले आहेत. नाशिक मधल्या आपल्या मर्जीतल्या बिल्डरांना भूसंपादनाच्या नावाखाली आठशे कोटी रुपयांची कशी खैरात केली आणि हे ८०० कोटी बिल्डरांच्या माध्यमातून कोणाला गेले यासंदर्भात माझं काम चालू आहे अस संजय राऊत म्हणले.

या घोटाळ्याबाबत रितसर तक्रार करणार आहे. नगर विकास खात मुख्यमंर्त्याच्या अधिपत्याखाली आहे. सर्व महानगरपालिका क्षेत्रांमध्ये अशाप्रकारे घोटाळे होत आहेत. हा जो पैसा राजकारणामध्ये येत आहे. सध्या महाराष्ट्रात तो कोणत्या माध्यमातून येत आहे त्याचा खुलासा देखील करणार आहे. विशेषतः नाशिक महानगरपालिका एका नाशिक महानगरपालिकेमध्ये एका व्यवहारात भूसंपादनात ८०० कोटी रुपये गैर मार्गाने गोळा केले हा जनतेचा पैसा आहे

हा पैसा मग शिवसेना फडणवीस गट आहे त्यांच्याकडे कसा पोहोचत आहे हे मी दोन दिवसात तुमच्याकडे पुरावा सहित देणार आहे. नगर विकास खात्याचा घोटाळा सरकार कोणाचाही असेल नगर विकास मंत्री तेच होते आणि तेच आहेत असं म्हणत संजय राऊत यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर निशाणा साधला आहे.

साधारण १७ ते १८ महत्त्वाचे बिल्डर आहेत ते शिवसेना फडणवीस गटाशी संबंधित आहेत. त्यांना हा लाभ मिळावा म्हणून हे भूसंपादनाचा रेटा लावला शेतकऱ्यांना पैसे मिळाले नाहीत बिल्डरांना पैसे मिळाले भूसंपादनाचे हे सगळे बिल्डर मिंदे आणि कंपनीचे खास हस्तक आहेत. समृद्धी मध्ये देखील तेच झाले आहे. ती ठिकाणी भूसंपादनाच्या बाबतीत हेच होत आहे असे गंभीर आरोप संजय राऊत यांनी केले आहेत. मी फक्त सध्या नाशिक महानगरपालिकेतल्या

# विखे पाटलांची गुंडाराज वाढल्याची टीका

## निलेश लंकेंनी एका वाक्यात विषय संपवला

**अहमदनगर :** नगर जिल्ह्यात गुंडाराज वाढला असून या निवणुकीत जनताच हा गुंडाराज संपवेल अशी टिका महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी निलेश लंके यांच्यावर केली होती. विखे पाटलांच्या या टीकेला निलेश लंके यांच्यासह राष्ट्रवादीचे आमदार प्राजक्त तनपुरे यांनी जोरदार प्रतिउत्तर दिलंय. तर माझ्याविरोधात प्रधानमंर्त्यासह अनेक मोठ्या नेत्यांच्या सभा होत आहेत. इथेच माझा विजय झाला असून माझा गुलाल फिक्स आहे, असा टोला देखील निलेश लंके यांनी लगावला आहे.



गुंडाराज कुणाचे हे सर्व जनतेला माहिती : निलेश लंके

विखे पाटील यांच्या टीकेवर बोलताना निलेश लंके म्हणाले, की गुंडाराज कुणाचे हे सर्व जनतेला माहिती आहे. राहात्यात (विखेंचा मतदारसंघ) जाऊन पहा गुंडाराज काय असतो. कार्यकर्त्यांनी व्हॉटस्अप स्टेटस ठेवला तरी मारहाण केली जाते. माझ्यावर शेतकऱ्यांच्या आंदोलनाचा एक गुन्हा दाखल आहे. त्यामुळे गुंडाराज यांचाच असून पोलीस प्रशासनाचा देखील वापर केला जात असल्याचा आरोप निलेश लंके यांनी केला. त्यामुळे जनता यांनाच दाखवून देईल, असा पलटवार लंके यांनी केला.

मोदींची सभा होतेय इथेच माझा विजय : लंके

माझ्या विरोधात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सभा होतीये इथेच माझा विजय झाला आहे. माझ्यासारख्या सर्वसामान्यासाठी देशाचे प्रधानमंत्री आणि अनेक नेते येत आहेत. त्यामुळे माझा गुलाल फिक्स आहे. आपण पंतप्रधानांना टिव्हीवरच बघत होतो. आता ते माझ्या विरोधात येतायेत. आपली किती ताकद वाढलीय, असा मिश्किल टोला निलेश लंके यांनी लगावला.

विखेंना गुंडांविषयी बोलण्याचा नैतिक अधिकार नाही : प्राजक्त तनपुरे

विखे पाटलांना गुंडांविषयी बोलण्याचा नैतिक अधिकार नाही. त्यांच्या आजूबाजूला, कडेवर गुंडच असतात. राहुरी मतदारसंघाच्या माजी आमदारावर इतके गुन्हे आहेत की ते तडीपार व्हायला पाहिजे. नगर शहरातले नावाजलेले गुंड यांच्याच मंचावर असतात. दुसऱ्याकडे एक बोट दाखवताना आपल्याकडे चार बोटं असतात याचे आत्मपरिक्षण करा. नगर शहरात गुंड सर्वसामान्य लोकांच्या जमिनीचे ताबे घेतायेत. तुमच्या राज्यात काय चाललंय ते बघा. तुमचं राज्य थोड्याच दिवसाचं आहे, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार प्राजक्त तनपुरे यांनी केली.

# 'दिघे गेल्यानंतर शिवसेनेत' संपत्तीवरुन आरोप करणाऱ्या शिंदेंना ठाकरेंचे उत्तर

**छत्रपती संभाजीनगर :** आनंद दिघेंचे आयुष्य आश्रमात गेले. मात्र, जेव्हा निधन झाले तेव्हा दिघे साहेबांची कुठे कुठे प्रॉप्रटीवर आहे, असा पहिला प्रश्न उद्धव ठाकरेंनी विचारला होता. दिघे यांच्या प्रॉपर्टीवर उद्धव ठाकरेंचा डोळा होता, अशी घणाघाती टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. एकनाथ शिंदेंच्या आरोपांना ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी प्रत्युत्तर दिले आहे. ''ज्या व्यक्तीने आनंद दिघे गेल्यानंतर एवढी वर्षे शिवसेनेत अनेक पदं भोगली. या व्यक्तीच्या आरोपांना आम्ही का उत्तर द्यायचे? आम्ही खोटे बोलणाऱ्यांना उत्तर देत नाहीत. एवढा गद्दारीचा प्रकार केला, त्यांना जनता उत्तर देईल'', असे आदित्य ठाकरे यांनी म्हटले आहे.

आदित्य ठाकरेंचा शिंदेंवर पलटवार

आदित्य ठाकरे म्हणाले, जर घटनाबाह्य मुख्यमंत्री काही आरोप करत असतील तर करू द्या त्याला आम्ही उत्तर देणार नाही, कोण काय बोलतंय त्यावर लक्ष देण्यापेक्षा इतर महत्वाचे मुद्दे आहेत. महागाई आहे, ३७० कलम काढल्यानंतर दहशतवाद संपेल असे म्हणणारे पुन्हा हल्ले सुरू झाले त्यावर बोलणार का? असा सवाल आदित्य ठाकरे यांनी केलाय. संभाजीनगरमध्ये लढत ही निष्ठावान विरुद्ध गद्दार अशी आहे. यामध्ये निष्ठावान लोकांचा विजय होईल, असेही ठाकरेंनी सांगितले.

महाराष्ट्रीयन तरुणांना अशा पद्धतीचे वागणूक देणे चुकीचे

सगळे उद्योग महाराष्ट्राचे गुजरातमध्ये जात आहे. त्यात महाराष्ट्रीयन तरुणांना अशा पद्धतीची वागणूक दिली जात आहे. हे निश्चितपणे चूक आहे. पुन्हा भाजपचं सरकार आलं तर याहून वाईट अवस्था होईल अशी टीका आदित्य ठाकरे यांनी केली.

मुख्यमंत्री शिंदेंचा आरोप काय?

धर्मवीर आनंद दिघे साहेबांची लोकप्रियता वाढत होती. यशाच्या शिखरावर असताना त्यांना त्रास देण्याचे काम त्यांनी केले. इतकेच काय त्यांचे जिल्हाध्यक्षपद काढून घेण्याचे कारस्थान सुरु होते. दिघेंचे आयुष्य आश्रमात गेले मात्र जेव्हा निधन झाले तेव्हा दिघे साहेबांची कुठे कुठे प्रॉप्रटीवर आहे, असा पहिला प्रश्न उद्धव ठाकरेंनी विचारला होता. दिघे यांच्या प्रॉपर्टीवर उद्धव ठाकरेंचा डोळा होता, अशी घणाघाती टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.

# २६११ संदर्भात विजय वडेट्टीवार यांचे वक्तव्य निराधार

## उज्ज्वल निकम यांचा दावा, 'गोबेल्स प्रचार' असल्याचा केला आरोप

**मुंबई :** हेमंत करकरे यांना लागलेली गोळी कसाबच्या बंदुकीतील नसून 'आरएसएस' समर्थक पोलीस अधिकाऱ्याच्या बंदुकीतील होती, असा खळबळजनक आरोप विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केलाय. मात्र, न्यायालयात याबाबत पुरावे लपण्यात आले होते. ते पुरावे लपवणारे देशद्रोही कोण, तर ते उज्ज्वल निकम आहेत. अशा देशद्रोह्याला भाजपाने तिकीट दिल्याचे वडेट्टीवार यांनी म्हटले होते. यावरून उज्ज्वल निकम यांनी प्रतिक्रिया दिलीय.

''गोबेल्सचा प्रचार'' करायचा आहे : उज्ज्वल निकम यांनी वडेट्टीवार यांचा दावा ''निराधार'' असल्याचं सांगून फेटाळून लावला आहे. तसंच निकम यांनी आरोप केला की, हिटलरचे सहकार आणि नाझी पक्षाचे प्रमुख प्रचारक असलेल्या जोसेफ गोबेल्सचा संदर्भ देऊन त्यांना फक्त ''गोबेल्सचा प्रचार'' करायचा आहे. आम्ही न्यायालयीन पुरावे सादर केले आहेत. तुम्हाला फक्त गोबेल्सचा प्रचार करायचा आहे. यामुळं माझी बदनामी होत नाही तर तुमची बदनामी होते, असं निकम म्हणाले.

पाकिस्तानने कधीच वाद घातला नाही : पुढे निकम म्हणाले की, विजय वडेट्टीवार यांनी माझ्यावर केलेल्या आरोपांची मला पर्वा नाही. पण कसाब आणि त्याचा सहकारी अबू इस्माईलने हेमंत करकरे यांची हत्या केली, या गोष्टीवर पाकिस्तानने कधीच वाद घातला नाही. पण विरोधी पक्षनेते या संपूर्ण प्रकरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहेत. हल्ल्यात १६६ लोक मरण पावले, पण सर्व हुतात्मे झाले याचं मला दुःख आहे. ज्यांना संपूर्ण गोष्ट माहीत नाही, ते एका पुस्तकावर विश्वास ठेवतात आणि तुम्ही हेमंत करकरे यांचा अपमान करत आहात.

न्यायिक निष्कर्ष काय आहे : कसाबने कबूल केलं की, तो आणि त्याचा मित्र कामा हॉस्पिटलच्या बाहेर पोहोचले असताना त्यांना एक पोलीस जीप दिसली होती. त्या दोघांनी गोळीबार केला. ज्यामध्ये तीन पोलीस अधिकारी ठार झाले. त्यांनी त्यांचे मृतदेह वाहनाच्या मागे ठेवला आणि ते निघून गेले. जीपची तपासणी केली असता, ते पोलीस कर्मचारी नव्हते. तर माझ्या उमेदवारीनंतर तुम्ही हे विधान करत आहात असंही निकम म्हणाले.

पुस्तकात जे लिहिलं आहे तेच सांगितलं : या टीकेमुळं मोठ्या प्रमाणात संताप निर्माण झाल्यानंतर, विजय वडेट्टीवार यांनी स्पष्टीकरण जारी केलं. ते म्हणाले की, ते माझे शब्द नाहीत, मी फक्त एस.एम. मुश्रीफ यांच्या पुस्तकात जे लिहिलं आहे तेच सांगितलंय. हेमंत करकरे यांना ज्या बंदुकीने गोळ्या झाडल्या त्या गोळीची प्रत्येक माहिती होती, ती दहशतवाद्यांची गोळी

# सांगलीतील काही मतदान केंद्रांवर बीप आवाजावरुन मतदारांमध्ये शंका

**सांगली :** शहरातील काहीमतदानकेंद्रांवर बीप आवाजावरुन शंका-कुशंका उपस्थित झाल्या. बदण दाबल्यानंतर जेव्हा लाल दिवा लागतो तेव्हामतदानझाल्याचे मानले जाते. त्यानंतर लगेचच बीपचा आवाज ऐकायला मिळतो. मात्रसांगलीतीलकाही केंद्रांवर बीपचा आवाज उशिरा येत असल्याने मतदार गोंधळून गेले.



सांगलीच्या शांतिनिकेतन येतील केंद्रातील खोली क्रमांक ४ मधील यंत्रांबाबत हाच गोंधळ होता. रांगेत थांबलेल्या लोकांना बीपचा आवाज ऐकू येत नव्हता. त्यामुळे मतदान करतेवेळी ते कर्मचाऱ्यांसमोर शंका उपस्थित करीत होते. काहींनी बटण दीर्घकाळ दाबून धरण्याचा प्रयोग केला. यंत्राच्या बीपचा आवाज उशिराने येतो, असे सांगून कर्मचारी दमले. मतदान झाल्यानंतर मतदार दरवाजातून बाहेर पडत असताना अत्यंत मंदपणे बीपचा आवाज येत होता.

एका मतदाराने याबाबतचे कारण कर्मचाऱ्यांना विचारल्यानंतर त्यांना उत्तर काय द्यायचे, असा प्रश्न पडला. व्हीव्हीपॅट मशिनवर स्लीप पाहून झाल्यानंतरही काही वेळाने बीपचा आवाज येत होता. त्यामुळे मतदान झाले की नाही, याबाबत शंका उपस्थित केल्या जात होत्या.

काही मतदारांनी शंका उपस्थित केल्यानंतर कर्मचारी त्यांना दिलासा देत हाते. 'मतदान यंत्र ठीक आहे. त्यात कोणताही दोष नाही. बीपचा आवाज कधी आला यापेक्षा व्हीव्हीपॅटवरील स्लीप पहा आणि निश्चिंत रहा', असे सांगितले.

# अक्षय्य तृतीयेपूर्वीच भाववाढ

## चांदी ११०० तर सोने ३५० रुपयांनी वधारले

जळगाव : गेल्या काही दिवसांपासून किरकोळ चढउतार होत असलेल्याचांदीच्याभावात मंगळवार, ७ मे रोजी थेट १ हजार १०० रुपयांची वाढ झाली. त्यामुळेचांदी८२ हजार ७०० रुपये प्रतिकिलोवर पोहोचली. तसेच सोन्याच्याही भावात ३५० रुपयांची वाढ होऊन ते ७२ हजार ३०० रुपये प्रतितोळ्यावर पोहोचले. दोन दिवसांवर आलेल्या अक्षय्य तृतीया सणाच्या पूर्वीच दोन्ही मौल्यवान धातूंचे भाव वाढले आहेत.



एप्रिल महिन्याच्या सोने-चांदीच्या भावात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. मात्र मे महिन्याच्या सुरुवातीलाच हे भाव कमी झाले. त्यानंतर गेल्या दोन-तीन दिवसात किरकोळ चढउतार होत राहिले. मात्र मंगळवार, ७ मे रोजी चांदीच्या भावात थेट १ हजार १०० रुपयांची वाढ झाली. त्यामुळे २५ एप्रिलनंतर ती पुन्हा एकदा ८२ हजारांच्या पुढे जात ८२ हजार ७०० रुपये प्रतिकिलोवर पोहोचली. दुसरीकडे मे महिन्याच्या सुरुवातीलाच ७२ हजारांच्या आत आलेल्या सोन्याच्या भावात मंगळवारी ३५० रुपयांची वाढ झाली. त्यामुळे सोने ७१ हजार ९५० रुपयांवरून ७२ हजार ३०० रुपये प्रतितोळा झाले. सोने-चांदी खरेदीचा अक्षय मुहूर्त असलेला अक्षय्य तृतीया सण शुक्रवार, १० मे रोजी असून त्यापूर्वीच सोने-चांदी वधारत आहे.

# कांदा निर्यातबंदीची मोठी किंमत मोजावी लागली

## राज्यातील शेतकऱ्यांना एकरी तीन लाखांचा फटका

**नवी मुंबई :** केंद्र सरकारने लादलेल्याकांदानिर्यातीवरील बंदीमुळे गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा महाराष्ट्रातील ६ लाख ९४ हजार ९२९ मेट्रिक टनकांदानिर्यात कमी झाली असून, राज्याचे १,१७३ कोटींचे नुकसान झाले आहे. निर्यातबंदीमुळे देशांतर्गत भाव निम्म्यावर आल्यामुळे शेतकऱ्यांना या वर्षातील दोन हंगामात प्रतिएकरी तीन लाखांचा फटका सहन करावा लागला आहे.



जगातील ६० पेक्षा जास्त देशांमध्ये भारतातून कांदा निर्यात केला जातो. त्यात महाराष्ट्राचा वाटा ४० टक्के असतो. नाशिक जिल्हा देशातील कांद्याचे आगर समजला जातो.मात्र, वारंवार होणाऱ्या निर्यातबंदीचा व्यापाराला मोठा फटका बसत आहे. निर्यातीमध्ये दुप्पट वाढ झाल्याने स्थानिक बाजारपेठेतही कांद्याला चांगला भाव मिळू लागला होता; परंतु २०२३-२४ या वर्षात आधी निर्यातीवर शुल्क लावणे, तसेच निर्यातबंदी केल्यामुळे वर्षभरात निर्यात घटून १,८७५ कोटींवर आली. गतवर्षीच्या तुलनेत राज्याची निर्यातीमधील उलाढाल १,१०० कोटींनी कमी झाली.

# 'बारामतीत पोलीस बंदोबस्तात पैशांचा पाऊस'

## रोहित पवारांनी शेअर केले व्हिडीओ, रात्री १२ नंतर बँकही चालू?

**बारामती :** बारामती लोकसभा मतदारसंघात मतदानाच्या पूर्वसंध्येला मतदारांमध्ये पैशांचे वाटप झाल्याचा आरोप होत आहे. शरद पवार गटातील आमदार आणि नेत्यांनी हा आरोप केला आहे की, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या अजित पवार गटाने मतदारांना पैसे वाटले आहेत असं म्हणत शरद पवार गटाचे बारामतीचे शहराध्यक्ष संदीप गुजर आणि युवक अध्यक्ष सत्यव्रत काळे यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. तसेच या प्रकरणी कर्जत-जामखेडचे आमदार रोहित पवार यांनीदेखील अजित पवार गटावर टीका केली आहे. पाठोपाठ रोहित पवार यांनी काही व्हिडीओ शेअर केले आहेत. बारामतीत पोलीस बंदोबस्तात पैसेवाटप होत असल्याचा दावा करत रोहित पवारांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर चार व्हिडीओ शेअर केले आहेत. तसेच बारामतीत रात्री १२ नंतरही बँकेचे कामकाज चालू असल्याचा एक व्हिडीओ रोहित पवार यांनी शेअर केला आहे.




रोहित पवारांनी शेअर केलेल्या व्हिडीओत राष्ट्रवादीच्या अजित पवार गटातील आणि शरद पवार गटातील कार्यकर्त्यांमध्ये बाचाबाची चालू असल्याचं पाहायला मिळत आहे. तिथे पोलीसही उपस्थित असल्याच दिसत आहे. एका कारमध्ये ठेवलेले पैसेदेखील व्हिडीओत दिसत आहेत. हे व्हिडीओ शेअर करत रोहित पवार यांनी म्हटले आहे की, बारामती मतदारसंघात चक्क पोलिस 'बंदोबस्तात' पडतोय पैशांचा पाऊसष्ठ यासंदर्भात भोर तालुक्यातील काही व्हिडीओ शेअर करतोयष्ठ यामध्ये भोर तालुक्यातील 'अजितदादा मित्रमंडळा'चा पदाधिकारी आणि मावळमधील एका नेत्याचे कार्यकर्तेही दिसत आहेत. यासाठीच पाहीजे होती का 'वाय' दर्जाची सुरक्षा?

अजित पवार यांचे पुत्र आणि २०१९ च्या मावळच्या लोकसभा निवडणुकीत पराभूत झालेले पार्थ पवार यांना अलीकडेच गृहमंत्रालयाने वाय दर्जाची सुरुक्षा दिली आहे. पार्थ पवार गेल्या काही महिन्यांपासून मावळमध्ये पक्षाची मोर्चेबांधणी करत आहेत. रोहित पवारांनी मावळमधील नेते आणि वाय प्लस दर्जाची सुरक्षा असा उल्लेख करून पार्थ पवारांवर निशाणा साधला असल्याची चर्चा आहे.

दरम्यान, रोहित पवार यांनी बारामतीतल्या वेल्हे येथील पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचं कामकाज रात्री १२ वाजले तरी चालू असल्याचा एक व्हिडीओ शेअर केला आहे. रोहित पवार यांनी बँकेचेही व्हिडीओ एक्सवर शेअर केले आहेत. तसेच त्यांनी म्हटलं आहे की, पीडीसीसी बँकेच्या वेल्हे शाखेतील घड्याळ बहुतेक बंद पडलंय. रात्रीचे १२ वाजले तरी बँक चालू आहे. कदाचित उद्या मतदानामुळे आज रात्रभर ओव्हर टाईम चालू असावा.

# 'ईव्हीएम' मशीन हॅक करतो, अडीच कोटी द्या!

## थेट विरोधी पक्षनेते अंबादास दानवेंना पैशाची मागणी; आरोपीला पुणे पोलिसांनी ठोकल्या बेड्या

**पुणे :** ईव्हीएम हॅक करतो, मला अडीच कोटी द्या, अशी मागणी ठाकरे गटाचे नेते तथा विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्याकडे करण्यात आली आहे. सदर पैशाची मागणी करणाऱ्या आरोपीला पुण्यातून सापळा रचत गुन्हे शाखेच्या पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. सदर आरोपीला एक लाख रुपय घेताना रंगेहाथ पकडण्यात आले.

मारुती ढाकणे असे ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. पुणे पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने ही कारवाई केली आहे. सदर आरोपी हा मूळचा अहमदनगर जिल्ह्यातील राहिवासी असल्याची माहिती समोर आली आहे. सदर प्रकाराविषयी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी व्हिडिओ शेअर सविस्तर माहिती देखील दिली आहे. विशेष बाब म्हणजे सदर आरोपीला अटक करण्यासाठी अंबादास दानवे यांच्या भावाने देखील पुणे पोलिसांना मदत केली आहे.

संभाजीनगर लोकसभा मतदारसंघात जेवढे एव्हिएम आहेत, ते सर्व हॅक करुन तुम्हाला हवा तसा निकाल देतो, असे आश्वासन देत अंबादास दानवेंना मारुती ढाकणे या युवकाने वारंवार फोन केला. त्यासाठी अडीच कोटी रुपये दानवे यांच्याकडे मागितले गेले. या संदर्भात दानवेंना संशय आणल्यानंतर त्यांनी पोलिसांकडे तक्रार केली. पोलिसांनी सापळा रचत अंबादास दानवे यांच्याकडे पैसे दिले. पुण्यातील एका हॉटेलमध्ये मारुती ढाकणेला पैसे घेताना रंगेहात पकडले आहे. आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी या प्रकरणी त्या व्यक्तीस अटक केली.

अंबादास दानवे यांच्याकडे अडीच कोटींची मागणी करताना आरोपीने संभाजीनगर लोकसभा मतदारसंघात मदत करण्याचे आश्वासन दिले. इव्हीएम हॅक करुन तुम्हाला संभाजीनगरमध्ये पाहिजे तसा रिझल्ट मिळवून देऊ, असे आरोपीने अंबादास दानवे यांना आश्वासन दिले. त्यानंतर दानवेंनी पोलिसांना फोन करत याबाबतची संपूर्ण माहिती दिली. त्यानंतर दानवे यांच्या भावासह पुण्याच्या स्थानिक गुन्हे शाखेने सापळा रचत आरोपीला अटक केली आहे.

# मोदींच्या सभेला प्रतिसाद मिळेना; ७०० रुपये देऊन लोक जमविण्याची पाळी



## आमदार पृथ्वीराज चव्हाणांचा आरोप

**पुणे :** निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ४०० पार नारा, राज्यात ४५ पार घोषणा दिल्या. भाजप खासदार यांनी संविधान बदलणे वक्तव्य केली. मागील निवडणुकीत मोदी यांनी राज्यात सात मोठ्या मीटिंग घेतल्या पण आता १२ मीटिंग घेतल्या आहे. त्यांच्या अपेक्षा प्रमाणे निवडणूक पुढे सरकत नाही. त्यांची भाषा काँग्रेस नेते, जाहीरनामा टिका याच बाबी आहे, पुढील पाच वर्षातील विकास बाबत ते बोलत नाही.

नरेंद्र मोदी यांच्या सभेला नागरिकांचा प्रतिसाद मिळत नाही, ७०० रुपये देऊन लोक जमा केले जातात. सभेला गर्दी प्रतिसाद मिळत नसल्याने त्यांची भाषा घसरली असून आतापर्यंत कोणत्या पंतप्रधान यांनी अशी भाषा वापरलेली नाही. दोन समाजात तेढ निर्माण करून आपली मते वाढवणे प्रयत्न सुरू आहेत. अजित पवार यांना नरेंद्र मोदी यांच्या शरद पवार यांच्याबाबत वक्तव्य प्रकरण नंतर बॅनर काढावे लागले, असे मत माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले. यावेळी शहराध्यक्ष अरविंद शिंदे, माजी आमदार मोहन जोशी,प्रवक्ते गोपाळ तिवारी,अभय छाजेड ,गौरव बोराडे उपस्थित होते.

चव्हाण म्हणाले, लोकसभा निवडणूक मध्यावर येऊन पोहोचली आहे. एकंदरीत वातावरण आतापर्यंत दिसत आहे, व्यक्तिगत नरेंद्र मोदी विरोधात लाट देशभरात दिसत आहे. या निवडणुकीत महविकास आघाडीचा मोठा विजय होईल. रवींद्र धंगेकर यांना पुण्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे, त्यांच्या प्रचारातील तृटी दूर करण्यात आल्या आहे. नरेंद्र मोदी यांनी लोकांना दिलेली आश्वासने पूर्तता केली नाही. आश्वासने पूर्ण न केल्यास निवडणूक बंदी केली पाहिजे. हा कायदा आल्यास मोदी यांना कायमस्वरूपी निवडणूक बंदी होईल. जनतेने ही निवडणूक हाती घेतली आहे. महागाई, बेरोजगारी, शेतकरी दयनीय अवस्था, निवडणूक रोखे भ्रष्टाचार, सत्ता गैरवापर, व्यक्ती केंद्रित राजकारण या मुद्द्यावर लोक त्यांच्या विरोधात आहे.

अरविंद शिंदे म्हणाले, पुणे लोकसभा निवडणुकीत पाच अपक्ष उमेदवार यांनी संविधान डोळ्यासमोर ठेऊन लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी काँग्रेस उमेदवार रवींद्र धंगेकर यांना पाठिंबा जाहीर केला आहे. एमआयएमचे एकमेव माजी नगरसेवक डॅनियल लांडगे आणि अश्विनी लांडगे यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश करण्याचे ठरवले आहे.

# अशोक सराफ, प्रल्हाद पै, डॉ. कैलास काटकर यांना 'गुरुमहात्म्य पुरस्कार'

**पुणे :** बुधवार पेठेतील कै. श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्तमंदिर ट्रस्टतर्फे देण्यात येणारा 'गुरुमहात्म्य पुरस्कार' यंदा ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ, जीवन विद्या मिशनचे प्रल्हाद वामनराव पै आणि ज्येष्ठ उद्योजक डॉ. कैलास काटकर यांना प्रदान करण्यात येणार आहे. अक्षय्य तृतीयेच्या दिवशी शुक्रवार, दिनांक १० मे रोजी सायंकाळी ५ वाजता बालगंधर्व रंगमंदिर येथील कार्यक्रमात देण्यात येईल, अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्ष युवराज गाडवे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पत्रकार परिषदेला ट्रस्टचे कार्यकारी विश्वस्त डॉ. पराग काळकर, खजिनदार अ‍ॅड. रजनी उकरंडे, उत्सव प्रमुख अक्षय हलवाई, उत्सव उपप्रमुख सुनिल रुकारी, विश्वस्त अ‍ॅड. प्रताप परदेशी, अ‍ॅड.शिवराज कदम जहागिरदार, राजू बलकवडे आदी उपस्थित होते. श्री दत्त महाराजांची प्रतिकृती असलेले सन्मानचिन्ह, महावस्त्र व रुपये २५ हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरुप आहे.

कार्यक्रमाला ज्येष्ठ सिने दिग्दर्शक राजदत्त, विद्यावाचस्पती डॉ.शंकर अभ्यंकर, ज्येष्ठ संगणक तज्ज्ञ डॉ. दीपक शिकारपूर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# माढ्यात शेतकऱ्याने कांदा ठेवून दाबले ईव्हीएमचे बटन

**माढा :** लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यांतर्गत आज राज्यातील ११ मतदारसंघांत निवडणूक सुरू आहे. त्यात एका कांदा उत्पादक शेतकऱ्याचा व्हिडिओ चांगलाच व्हायरल झाला आहे. या व्हिडिओत हा शेतकरी ईव्हीएमवर कांदा ठेवतो आणि त्यानंतर एका विशिष्ट पक्षाचे बटन दाबतो. त्याची ही कृती केंद्राच्या कांदा निर्यात बंदीविरोधात असल्याचे मानले जात आहे.

केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने काही महिन्यांपूर्वी कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातली होती. त्यानंतर कांद्याच्या दरात मोठी घसरण झाली. पर्यायाने त्याचा फटका राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना बसला. शेतकऱ्यांनी केंद्राकडे अनेकदा आपला निर्णय मागे घेण्याची विनंती केली. पण सरकारने निर्यातबंदीचा निर्णय मागे न घेता त्याची मुदत वेळोवेळी वाढवली. यामुळे शेतकरी चांगलेच संतापले होते. त्यानंतर तिसऱ्या टप्प्यातील निवडणुकीच्या ऐन तोंडावर सरकारने कांदा निर्यातबंदी मागे घेतली. या निर्णयाचा शेतकऱ्यांना काहीअंशी फायदा होण्याची शक्यता असली तरी, त्यांचा सरकारवरील रोष मात्र कमी झाला नाही.

माढा लोकसभा मतदारसंघात मंगळवारी सुरू असलेल्या मतदानात एका शेतकऱ्याने कांद्याने ईव्हीएमवरील बटन दाबून केंद्राच्या कांदा निर्यातबंदीविरोधातील आपला रोष व्यक्त केला. हा शेतकरी करमाळा तालुक्यातील एका गावचा असल्याची माहिती आहे. त्याच्या व्हायरल झालेल्या व्हिडिओत दिसून येत आहे की, तो प्रथम ईव्हीएमवरील सत्ताधारी पक्षाच्या चिन्हापुढे एक छोटासा कांदा ठेवतो. त्यानंतर तो कांदा उचलून तो थेट विरोधी पक्षाच्या उमेदवाराच्या नावापुढील बटन दाबतो. त्यानंतर व्हीव्हीपॅट मशिनमध्ये त्या उमेदवाराचे नाव व चिन्ह दिसते. हा व्हिडिओ चांगलाच व्हायरल झाला आहे.

# मतदान रांगेत वृद्धाचा हृदयविकाराने मृत्यू

**कोल्हापूर :** कोल्हापूर लोकसभेसाठी सुरू असणाऱ्या मतदानात एका वृद्ध व्यक्तीचा मतदानाच्या रांगेतच हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. कोल्हापूर शहरातील उत्तरेश्वर पेठेतील रमबाई आंबेडकर शाळेतील मतदान केंद्रावर ही घटना घडली. येथे महादेव श्रीपती सुतार (६९) हे मतदानासाठी आले होते. तिथे रांगेत उभे असताना त्यांना भोवळ आली. त्यानंतर ते जागेवरच कोसळले. यावेळी नातलगांसह राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांनी त्यांना रुग्णालयात दाखल केले. पण उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला.

# पाटण तालुक्यातील नागरिकांना ई-शिधापत्रिकांऐवजी जुनी शिधापत्रिका किंवा स्मार्ट कार्ड द्यावे!

## शेतकरी सेना जिल्हाध्यक्ष विकास हादवे यांची मागणी

**सातारा / प्रतिनिधी**

पाटण पुरवठा विभागाकडून नागरिकांना आता जुन्या प्लास्टिक कव्हर असलेल्या शिधापत्रिका ऐवजी ई शिधापत्रिका देण्यात येत असून तालुक्यात मोठ्या प्रमाणावर पडणारा पावसाचे प्रमाण लक्षात घेता हि साध्या कागदाची ई शिधापत्रिका टिकणार नाही यामुळे हि शिधापत्रिका रद्द करून पहिल्या सारखीच प्लास्टिक पुट्टे असणारी शिधापत्रिका अथवा स्मार्ट कार्ड देण्यात यावे अशी मागणी शिवसेना प्रणित शेतकरी सेनेचे सातारा जिल्हाध्यक्ष विकास महादेव हादवे यांनी सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री ना शंभुराज देसाई यांच्या पाटण येथील जनता दरबारात केली असून याबाबतची कार्यवाही पाटण तहसिलदार कार्यालयाकडून जिल्हा पुरवठा विभागाकडे सुरु असल्याची माहिती विकास हादवे यांनी दिली आहे.



पाटण तालुक्यात पावसाचे प्रमाण लक्षात घेता जिथे प्लास्टिक पुठ्ठ्याची शिधापत्रिका टिकत नाही तेथे साध्या कागदाची ई शिधापत्रिका कशी काय टिकणार, डोंगर दऱ्या तील अशिक्षित लोक हि शिधापत्रिका वापरू शकणार नाहीत.

यामुळे सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत नागरिकांना देण्यात येणारी ई शिधापत्रिका रद्द करून त्याऐवजी प्लास्टिक पुट्याची शिधापत्रिका देण्यात यावी किंवा स्मार्ट कार्ड देण्यात यावे. याबाबत आपल्या निवेदनानुसार पुरवठा विभागाकडे कार्यवाही सुरू असून नागरिकांना प्लास्टिक शिधापत्रिका अथवा स्मार्ट कार्ड देण्यात यावे अशी मागणी विकास हादवे यांनी केली आहे.

पान १ वरून

## बारामती लोकसभा मतदारसंघामध्ये ४६ टक्के मतदान

या महा व्होल्टेज निवडणुकीतील निवडणूक प्रक्रिये बाबत वार्तांकनासाठी मोठी गर्दी केली होती.उन्हाच्या झळांमुळे मतदान कमी होण्याची शक्यता वर्तविण्यात येत होती, मात्र मतदारांचा उन्हाची तीव्रता असताना देखील दुपारी तीन नंतर प्रतिसाद पहायला मिळाला. निवडणूक विभागाकडून मतदान केंद्रांवर सावलीसाठी टाकण्यात आलेले मंडप, वैद्यकीय सुविधा आणि ओआरएस कीट या सुविधा देण्यात आल्याने मतदारांनी रांगा लावून आपला मतदानाचा हक्क बजावला.

बारामती लोकसभा मतदार संघामध्ये बारामती, दौंड, इंदापूर खडकवासला आहे एकूण सहा विधानसभा मतदार संघ आहेत तालुकानिहाय मतदानाचे आकडे सायंकाळी पाच वाजेपर्यंतचे पुढील प्रमाणे

बारामती विधानसभा मतदार संघामध्ये ५४.७५ टक्के मतदान झाले. इंदापूर विधानसभा मतदार संघामध्ये ५० टक्के मतदान झाले. पुरंदर विधानसभा मतदार संघामध्ये ४१ टक्के मतदान झाले आहे. भोर-वेल्हा-मुळशी विधानसभा मतदार संघात ४८टक्के मतदान झाले. दौंड विधानसभा मतदार संघामध्ये ४३ टक्के मतदाना झाले. खडकवासला विधानसभा मतदार संघात ४० टक्के मतदान झाले.सकाळ पासूनच मतदान बुथवर मतदारांनी मतदान करण्यास सुरुवात केली. काही ठिकाणी तांत्रिक बिघाडामुळे थोडा व्यत्यय आला.मॉपपोल दरम्यान ४९ बीयु, १८ सीयु आणि १३ व्हीव्हीपॅट तांत्रिक बिघाडामुळे बदलण्यात आले. तर मतदान सुरू झाल्यानंतर १५ बीयु, ५ सीयु आणि २३ व्हीचीपॅट तांत्रिक बिघाडामुळे बदलण्यात आले त्यामुळे जरी तांत्रिक बिघाड असला तरी मतदारांमध्ये गोंधळ झाला. दरम्यान इंदापूरचे आमदार दत्तात्रय भरणे यांच्या आक्षेपार्ह व्हिडिओ क्लिप ची चर्चा संपूर्ण बारामती लोकसभा मतदारसंघांमध्ये दिवसभर सुरू होती. आमदार रोहित पवार यांनी विरोधी गटाने पैसे वाटप केल्याचा आरोप केला.

## मतदानाच्या दिवशी सुप्रिया सुळे पोहोचल्या थेट अजित पवारांच्या घरी!

असतानाच सुप्रिया सुळे या बारामतीतील मतदानाच्याच दिवशी थेट अजित पवारांच्या काटेवाडीतील निवासस्थानी जाऊन धडकल्या आहेत. या नव्या ट्विस्टमुळे राजकीय वर्तुळात सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत.

बारामतीत सध्या सुप्रिया सुळे विरुद्ध अजित पवारांच्या पत्नी सुनेत्रा पवार असा लढा आहे. बारामतीत राष्ट्रवादीचा मतदार विभागला आहे. मात्र, त्यातच सुप्रिया सुळेंनी एक नवी खेळी खेळली आहे. मतदान केल्यानंतर त्या कोणालाही सोबत न घेता अजित पवारांच्या घरी दाखल झाल्या. या भेटीमागील कारण सुप्रिया सुळे यांनी सांगितले. आशाताई पवार म्हणजेच अजित पवारांच्या आईच्या भेटीसाठी त्या इथे दाखल झाल्याचं त्या म्हणाल्या. मात्र, केवळ काकींचा आशीर्वाद घेणं हेच एक कारण या भेटीमागे असू शकतं का यावर अनेक तर्कवितर्क लढवले जात आहेत.

सुप्रिया सुळेंनी अजित पवारांच्या काटेवाडीमधील घरी जाऊन अजित पवारांच्या आई आशा पवार यांची भेट घेतली. यावेळी घरी अजित पवार आणि सुनेत्रा पवार नव्हत्या. काकींना भेटण्यासाठी आपण आलो होतो असं सुप्रिया सुळे म्हणाल्या. 'आशा काकींना भेटायला आली होती, त्यांचा आशिर्वाद घ्यायला आली होती', असं त्यांनी माध्यमांसमोर स्पष्ट केलं.

## दहा वर्षात खासदारांनी एकही कामाची चुणूक दाखवली नाही - माऊली दाभाडे

येथील आज दि ७ रोजी आयोजित करण्यात आलेल्या कार्यकर्ता मेळाव्यात ते बोलत होते

यावेळी दाभाडे म्हणाले, महायुतीतील राष्ट्रवादी मित्र पक्षाने दहा वर्षात खासदारांनी मावळ तालुक्यात विकासाचे काय दिवे लावले असे विचारणा उघडपणे केली होती.तर भाजपाने बारणे नावाचा निष्क्रिय उमेदवार बदला आम्ही काम करणार नाही अशी थेट भूमिका मांडली होती. तरी देखील युतीच्या डोक्यावर मिऱ्या वाटत पुन्हा एकदा निष्क्रियतेचा ठपका असलेल्या बारणे यांना शिंदे यांनी उमेदवारी दिली.

भारत देश हा लोकशाही देश आहे. येथे प्रत्येकाला चांगलं वाईट निवडण्याचा अधिकार संविधानाने दिला आहे. मागील दहा वर्ष मावळ लोकसभेचे नेतृत्व करण्याची संधी मतदारांनी बारणे यांना दिली.आम्ही सुध्दा त्यांचा प्रचार केला होता. मात्र त्यांनी दहा वर्षात एकही कामाची चुणूक दाखवली नाही.असा नामधारी खासदार काय कामाचा आहे त्याविरुध्द महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे यांच्या कार्यकाळात पिंपरी चिंचवड महानगरपालिका आशिया खंडातील सर्वांत श्रीमंत महानगरपालिका झाली. त्यांचे वडील यांनी त्या भागात औद्योगिक क्रांती घडवली अशी खान दानीपरंपरा असलेला उमेदवार असल्याने यावेळी मतदारांनी भावनेवर आधारित नाहीत तर मेरिट वर आधारित व स्थानिक प्रश्न सोडवण्यासाठी काम करणारा उमेदवार लोकसभेत पाठवण्याचा संकल्प केला आहे .

मावळ लोकसभा मतदारसंघातील इंडिया आघाडीचे उमेदवार संजोग भिकू वाघेरे-पाटील यांना मावळातून किमान ५० हजारांचे मताधिक्य मिळवून देऊ असा विश्वास सहकार महर्षी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माऊली दाभाडे यांनी यावेळी व्यक्त केला.

## बारामतीत लंडनहून आलेल्या युवकाने बजावला मतदानाचा हक्क

या ब्रीदवाक्यानुसार खास भारतीय लोकसभा निवडणुक २०२४, यासाठी खास मतदान करण्यासाठी साहिल संजीव बोराटे हा युनायटेड किंगडम (लंडन) येथे उच्च शिक्षण घेत आहे.तो युनिव्हर्सिटी ऑफ लिव्हरपुल येथे मास्टर इन ऑपरेशन अँड सप्लाय चेन मॅनेजमेंट हा मॅनेजमेंट अभ्यासक्रम करीत आहे. खास भारतीय संविधान आणि आपल स्वतःच राष्ट्रीय कर्तव्य बजावण्यासाठी तो बारामतीत मतदानासाठी आला आहे.

## काँग्रेस हा विकास विरोधी पक्ष, मराठवाडा त्याचा बळी

ढाळले, असा आरोप करून मोदी यांनी काँग्रेस आणि दहशतवाद्यांचे नेमके नाते कोणते? काँग्रेसचे शहजादे हे कोणते नाते निभावत आहेत, असा सवाल केला. इंडिया आघाडी सत्तेवर आली तर... देशात इंडिया आघाडी सत्तेवर आली तर आपण काश्मीरचा स्वतंत्र दर्जा काढून घेणारे कलम ३७० पुन्हा लागू करू, नागरिकत्व सुधारणा कायदा रद्द करू, तीन तलाकची पद्धत पुन्हा लागू करू, असे त्यांचे नेते सांगत आहेत. इतकेच काय, अयोध्या राम मंदिर खटल्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निकाल फिरविण्याचेही या लोकांचे मनसुबे आहेत, असा आरोप करतानाच मोदी यांनी, काँग्रेसच्या शहजाद्यांच्या पिताश्रींनी शहाबानो प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाचा निकाल फिरवला होता, असे नमूद केले. काँग्रेसचा आरक्षणावर डल्ला धर्माच्या आधारावर कदापी आरक्षण दिले जाणार नाही, अशी घटनाकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची ठाम भूमिका असूनही मागासवर्गीय, इतर मागासवर्गीय, आदिवासी यांच्या आरक्षणावर डल्ला मारून ते मुसलमानांच्या पदरात घालण्याचा काँग्रेसचा डाव आहे. कर्नाटकमध्ये रातोरात मुस्लिम समाजाचा इतर मागास प्रवर्गात समावेश करून काँग्रेसने खऱ्या ओबीसी समाजाच्या हक्कावर गदा आणली आहे, या आरोपाचा मोदी यांनी पुनरुच्चार केला. इंडिया आघाडीतील एक महत्त्वाचे नेते, ज्यांनी चारा घोटाळा प्रकरणी तुरुंगवास भोगला आहे, त्यांनी आज सकाळी याबाबत स्पष्टच सांगितले आहे, असेही मोदी म्हणाले. मोदी जिवंत असेपर्यंत वंचितांच्या हक्काच्या आरक्षणाला धक्का लावून देणार नाही, अशी ग्वाही देखील त्यांनी दिली.

# कडक उन्हामुळे विहिरीत पोहणाऱ्यांची गर्दी...

**राजगुरूनगर (वा.) :** एप्रिल - मे महिना म्हटलं की, कडक उन्हाळा हे समीकरण कायम असल्याने या काळात पोहण्याच्या मौजमस्तीचा आनंद लुटणारा वर्ग मोठ्या प्रमाणात आहे. पूर्वीसारख्या तुडुंब भरलेल्या पाण्याच्या विहिरी आता विरळच आहेत. मात्र, खेड तालुक्यात चास कमान धरणाच्या कॅनॉल मुळे कॅनॉलच्या जवळपास असणाऱ्या विहिरी पाण्याचा आब राखून आहेत. पोहणाऱ्या मंडळींची जिथे अशा पाण्याने भरलेल्या विहिरी मिळतील तिथे त्यांची पोहण्यासाठी तोबा गर्दी होत असते.



यापैकी काहीजण साप्ताहिक शनिवार, रविवार सुट्टीचा काळ सवंगड्यांसमवेत घालवण्यासाठी, कोणी आरोग्यासाठी, कोणी मौज मस्तीसाठी तर कोणी पुणे - मुंबई शहरातून वार्षिक उन्हाळ्याच्या सुटीचा काळ गावी विरंगुळ्यात घालण्यासाठी पाणी भरलेल्या विहिरींच्या शोधात असतो. जिथे अशी विहीर मिळेल तिथे लहानांपासून तरुणांपर्यंत अगदी पाण्यावर मारलेले हात-पाय जवळच्यालाही लागतील इतकी मोठ्या प्रमाणात गर्दीच गर्दी पाहावयास मिळते. या गर्दीत काहीजण खूप दिवस मोकळ्या वातावरणात पोहण्याची हौस भागवण्यासाठी येतात तर काहीजण आपल्या पुढच्या पिढीला तरबेज करण्यासाठी घेऊन येताना दिसतात. मग यासाठी त्यांच्याकडे रिकामे ड्रम, लाकडी पेटे, प्लास्टिकच्या बाटल्या तसेच गाड्यांच्या टायर मधील रबरी ट्युब अशा साधनांचा वापर करून त्याआधारे पाण्यात सोडलेल्या बाळ - गोपाळांची वेगळीच धांदल उडालेली पाहावयास मिळते.

त्यातल्या त्यात तरबेज पोहणाऱ्यांची तर तऱ्हाच न्यारी असते. ग्रामीण भागात पोहण्याच्या बाबत प्रसिद्ध असलेला मुटका (उंचावरून उडी मारून पाण्याजवळ गेल्यावर छातीशी हात धरून मांडी घालून पाण्यात पडणे) मारण्याची, सूर मारण्याची, पाठीवर झोपून पोहणे या सर्व गोष्टींची जणू स्पर्धाच लागल्याचे जाणवते.

मात्र, यावेळी काही पोहण्याबाबत जेष्ठ तज्ज्ञ उपयुक्त सूचनाही करतानाही दिसतात. त्यांची दखल घेणेही गरजेचे आहे. त्यानुसार लहान मुले कितीही तरबेज असली तरी त्यांना एकट्याला पाण्यात पोहायला सोडू नये. जेवण झाल्याझाल्या पोहू नये. आपले शरीर जेवणानंतर दोन तासांनी पोहण्यास अनुकूल असते; मात्र, सकाळच्यावेळी हा प्रश्न उद्भवत नाही. पोहण्याआधी शरीरात ऊब (वार्मअप) निर्माण करणे आवश्यक असते. सुरुवातीला डोक्यावर पाणी घेऊन पाण्यात उतरल्यास श्वसन प्रक्रियेत सुधार होतो. कधीही सुरुवातीला तीस चाळीस मिनिटे पोहणे हे आरोग्याच्या दृष्टीने चांगले असते असे जेष्ठांचे अनुभवाने संपन्न झालेले मत विचारात घेणेचे नवीन पिढीला विसरून चालणार नाही.

# गोव्यात ९ ते ११ दरम्यान सर्वाधिक मतदान



पणजी -मतदानाच्यादिवशी रणरणते ऊन आणि असह्य उकाडा असणार याची माहिती असल्यामुळे मतदारांनी सूर्य माथ्यावर येण्यापूर्वीच बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. ९ ते ११ या दरम्यान जवळ जवळ ३० टक्केमतदानझाले होते. १ वाजेपर्यंत निम्म्या मतदारांनी आपला हक्क बजावला होता.

हवामान खात्याच्या अंदाजानुसार मंगळवारी तापमान ३४ ते ३५ अंश सेल्सीयसपर्यंत तापणार होते. त्यामुळे सकाळीच लोक मतदानासाठी बाहेर पडतील अशी अपेक्षा होती. परंतु सकाळी ७ ते ९ वाजण्याच्या दरम्यान १३ टक्केच मतदान झाले होते. त्यानंतर ९ ते ११ वाजण्याच्या सुमारास अंदाजे २० टक्के मतदान होऊन एकूण एकूण मतदान ३० टक्क्यांपेक्षा वर गेले होते तर ३ वाजपर्यंत एकूण मतदान ६० टक्के झाले होते. दक्षीण गोव्यात आणि उत्तर गोव्यात असेच चित्र होते.

उत्तर गोव्यात प्रत्येक टप्प्यात साखळी विधानसभा मतदारसंघात सर्वाधिक मतदान झाले होते. ९ ते ११ या वेळेत १७ टक्के, ११ पर्यंत ३९ टक्के, १ पर्यंत ५४.४३ टक्के आणि ३ पर्यंत ७०.६६ टक्के इतके मतदान झाले होते. दक्षीण गोव्यात सकाळी ७ ते ९ पर्यंत सर्वाधीक मतदान कुडचडे विधानसभा मतदारसंघात १६.४ टक्के इतके झाले होते. ११ पर्यंत सांगेत ३४.२८ टक्के १ वाजेपर्यंत वाळपईत सर्वाधिक ५५.६६ टक्के मतदान तर ३ वाजेपर्यंत सांगे मतदारसंघात ६८.९६ टक्के मतदान झाले होते.

# हिमाचल प्रदेशातील केंद्रीय विद्यापीठाच्या ७ व्या दीक्षांत समारंभाला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची उपस्थिती

नवी दिल,६ मे (पीएसआय)

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज (६ मे, २०२४) धर्मशाला येथे हिमाचल प्रदेश केंद्रीय विद्यापीठाच्या ७ व्या दीक्षांत समारंभाला उपस्थित राहून विद्यार्थ्यांना संबोधित केले.



परिवर्तन हा निसर्गाचा नियम आहे, असे राष्ट्रपतींनी यावेळी बोलताना सांगितले. पण, पूर्वी बदलाची गती इतकी वेगवान नव्हती. आज आपण चौथ्या औद्योगिक क्रांतीच्या युगात आहोत. कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग सारखी नवीन क्षेत्रे वेगाने उदयास येत आहेत. बदलाचा वेग आणि परिमाण दोन्ही खूप जास्त आहेत, त्यामुळे तंत्रज्ञान आणि आवश्यक कौशल्ये खूप लवकर बदलत आहेत, असे त्या म्हणाल्या. त्यामुळे सतत नवनवीन कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक आहे, असेही त्यांनी सांगितले.

शिक्षण असे असले पाहिजे की ज्यामुळे विद्यार्थ्यांना ज्ञान देण्याबरोबरच ते स्वावलंबी बनतील आणि त्यांचे चरित्र्य आणि व्यक्तिमत्वही घडेल, असे राष्ट्रपतीने शिक्षकांना उद्देशून बोलताना सांगितले. विद्यार्थ्यांमध्ये त्यांची संस्कृती, परंपरा याबद्दल जागरुकता निर्माण करणे हा देखील शिक्षणाचा उद्देश आहे, असे त्या म्हणाल्या. या संदर्भात शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यांचे कार्यक्षेत्र केवळ शिकवण्यापुरते मर्यादित नसून राष्ट्राचे भवितव्य घडविण्याची मोठी जबाबदारी त्यांच्यावर आहे, असे राष्ट्रपतींनी स्पष्ट केले.

आपले लक्ष 'काय शिकायचे' यासोबतच 'कसे शिकायचे' यावर देखील असले पाहिजे, असे राष्ट्रपती म्हणाल्या. जेव्हा विद्यार्थी कोणत्याही तणावाशिवाय स्वतंत्रपणे शिकतात तेव्हा त्यांची सर्जनशीलता आणि कल्पनाशक्ती उंच भरारी घेते हे राष्ट्रपतींनी अधोरेखित केले.

करुणा, कर्तव्यनिष्ठा आणि संवेदनशीलता या मानवी मूल्यांना आपले आदर्श बनवण्याचे आवाहन राष्ट्रपतींनी विद्यार्थ्यांना केले. विद्यार्थी या मूल्यांच्या आधारावरच यशस्वी आणि अर्थपूर्ण जीवन जगू शकतात, असे त्या म्हणाल्या.

युवकांमध्ये विकासाची अफाट क्षमता आहे, असे राष्ट्रपती म्हणाल्या. युवकच विकसित भारताचा संकल्प पूर्ण करण्यासाठी सर्वात महत्त्वाचा दुवा आहेत. त्यामुळे त्यांनी राष्ट्रासाठी स्वत:ला समर्पित केले पाहिजे. हे त्यांचे मानवी, सामाजिक आणि नैतिक कर्तव्यच नाही तर नागरिक म्हणूनही त्यांचे कर्तव्य आहे, हे राष्ट्रपतींनी अधोरेखित केले.

# अभिनेता शेखर सुमन यांचा भाजपमध्ये प्रवेश



**राजदंड न्युज नेटवर्क**

लोकसभेची रणधुमाळी सुरू असताना भाजपमध्ये दरदिवशी पक्षप्रवेश होत आहेत.

मंगळवारीही (७ एप्रिल) अभिनेता शेखर सुमन यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

याशिवाय, काँग्रेसच्या माजी माध्यम समन्वयक राधिका खेडा यांनीही भाजपमध्ये प्रवेश केला आहे.

या दोघांनी भाजपच्या दिल्ली मुख्यालयात भाजपचं सदस्यत्व घेतलं.

५ मे रोजी राधिका यांनी एक पत्र प्रसारित करून काँग्रेसमधून राजीनामा देण्याची घोषणा केली होती.

मी एक मुलगी आहे आणि लढू शकते. ज्या पक्षाला मी माझ्या आयुष्यातील २२ वर्षांहून अधिक वर्षे दिली आहेत, जिथे मी NSUI ते AICC च्या मीडिया विभागापर्यंत पूर्ण प्रामाणिकपणे काम केले आहे. पण मी केवळ अयोध्येत जाऊन रामलल्लांचं दर्शन घेतल्याने मला तीव्र विरोधाला सामोरं जावं लागलं, असं खेडा यांनी सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटलं होतंमंगळवारी देशात लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यातील मतदान होत आहे.

# पंतप्रधान मोदी आणि भाजपमुळेच देशात द्वेषाचं वातावरण : सोनिया गांधी

**राजदंड न्युज नेटवर्क**

मंगळवारी काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांनी मंगळवारी एक व्हिडिओ संदेश जाहीर करत भाजपावर हल्ला चढवला.

सोनिया गांधी म्हणाल्या, आज देशाच्या कानाकोपऱ्यात तरुण-बेरोजगारीला, महिला-अत्याचारांना आणि दलित, आदिवासी, मागासवर्गीय, अल्पसंख्याक-प्रचंड भेदभावाला तोंड देत आहेत.



देशात असं वातावरण पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपामुळे आहे. त्यांना कोणत्याही परिस्थितीत सत्ता हस्तगत करायची आहे. राजकीय लाभ घेण्यासाठी त्यांनी द्वेष भावना वाढवलीय, असं सोनिया गांधी यांनी म्हटलं.

भारतातील लोकसभा निवडणुकीकडे जगातील सर्वात मोठा लोकशाही उत्सव म्हणून पाहिलं जातं. पण यंदाची निवडणूक ही धार्मिक ध्रुवीकरणाकडे जास्त झुकलीय, असा आरोप करण्यात येत आहे.

अशा वातावरणात काँग्रेसला मतदान करून मदत करा, असं सोनिया गांधी यांनी म्हटलं आहे.

काँग्रेस पक्ष आणि मी नेहमीच सर्वांचा विकास आणि वंचितांना न्याय मिळवून देण्याबरोबरच देशाला बलशाली करण्यासाठी संघर्ष केला आहे. आज पुन्हा मी तुमच्याकडे मदत मागते आहे, असं गांधी यांनी आपल्या म्हटलं.

त्या पुढे म्हणाल्या, आमचं न्याय पत्र आणि आमची गॅरंटीचा उद्देश देखील देशाला एकजूट ठेवणं आणि गरीबांना, महिलांना, शेतकऱ्यांना, मजूरांना आणि वंचित समाजाला बळ देणं हा आहे. काँग्रेस आणि इंडिया आघाडी, देशाची घटना आणि लोकशाहीच्या संरक्षणासाठी कटिबद्ध आहेत.

भारतीय तटरक्षक दलाने केरळच्या किनाऱ्याजवळून

# सहा भारतीयांसह इराणची बोट घेतली ताब्यात

**नवी दिल्ली :** भारतीय तटरक्षक दलाने (आयसीजी) ०५ मे २०२४ रोजी केरळच्या किनाऱ्याजवळ, बेपोरच्या पश्चिमेला असलेल्या समुद्री भागातून सहा भारतीय कर्मचाऱ्यांसह एक इराणी मासेमारी बोट ताब्यात घेतली. आयसीजीच्या बोटी आणि विमाने यांच्या वेगवान समुद्री-हवाई समन्वयासह ही यशस्वी कारवाई करण्यात आली.

इराणी बोटीला अडवल्यानंतर, आयसीजीच्या जवानांच्या तुकडीने बोटीवर प्रवेश केला आणि देशविरोधी कारवायांमधील सहभागाचा शोध घेण्याच्या दृष्टीने या बोटीची कसून तपासणी करण्यात आली. प्राथमिक चौकशीअंती असे दिसून आले की या बोटीचा मालक इराणी नागरिक असून त्याने तामिळनाडूमधील मासेमारांना कंत्राटी स्वरूपाच्या व्यवहारातून बोटीवर काम दिले आणि त्यांना इराण जवळील समुद्रात मासेमारी करण्यासाठी इराणी व्हिसा मिळवून दिले.

त्या बोटीवरील भारतीय कामगारांनी असा आरोप केला आहे की बोटीच्या मालकाने त्यांना वाईट वागणूक दिली आणि मुलभूत जीवनावश्यक बाबींपासून त्यांना वंचित ठेवले तसेच त्यांचे पासपोर्ट देखील आपल्या ताब्यात घेतले.

ताब्यात घेण्यात आलेली बोट अधिक तपासासाठी ६ मे २०२४ रोजी कोची येथे सुरक्षितपणे आणण्यात आली.

# इस्रायलनं नाकारला हमासचा शस्त्रसंधी प्रस्ताव, राफावर हल्ल्यांची घोषणा

**राजदंड न्युज नेटवर्क**

इस्रायल सेनेनं राफामध्ये हल्ले सुरू केल्याची घोषणा केली आहे.

इस्रायली डिफेन्स फोर्स म्हणेजच आयडीएफने म्हटलं आहे की, ते हमासविरोधात राफामध्ये 'टार्गेटेड' हल्ले करत आहेत.

राफामध्ये मोठ्या संख्येने शरणार्थी आहेत. त्यांना लवकरात लवकर अन्य ठिकाणच्या निर्वासित शिबिरांमध्ये जाण्यासाठी सांगण्यात आलं आहे.

इस्रायलने खान युनिसजवळच्या एका शिबिरातून एक लाख लोकांना निघून जाण्याचे आदेश दिले आहेत.



एकीकडे राफावर हल्ले होत असताना दुसरीकडे इस्रायलने हमासचा शस्त्रसंधीचा प्रस्ताव मान्य करायलाही नकार दिला आहे. या प्रस्तावावर पुढील चर्चा करण्यासाठी इस्रायल आपलं शिष्टमंडळ काहिराला पाठविण्याच्या तयारीत आहे.

हमासने ज्या शस्त्रसंधी प्रस्तावावर सहमती दर्शवली आहे, तो इस्रायलच्या मागण्यांपेक्षा प्रचंड वेगळा आहे.

इजिप्त आणि कतारने हमास-इस्रायलमध्ये मध्यस्थीचा प्रस्ताव दिला होता. हमासला हा प्रस्ताव मान्यही होता. मात्र इस्रायलने तो फेटाळला.

या शस्त्रसंधी प्रस्तावातील नेमक्या अटी काय आहेत, हे अजूनही समोर आलेलं नाही.

या प्रस्तावात इस्रायलच्या बंधकांना सोडण्याच्या बदल्यात इस्रायली तुरूंगात कैद अलेल्या पॅलेस्टिनी कैद्यांना सोडण्याची अट असू शकते.

संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरस यांनी इस्रायली सरकार आणि हमासला एका सामंजस्य करारावर सहमत होण्यासाठी अतिरिक्त प्रयत्न करण्याचं आवाहन केलं आहे.

# अरविंद केजरीवाल यांच्या जामिनावर अजूनही निर्णय नाही

**राजदंड न्युज नेटवर्क** :अरविंद केजरीवाल यांच्या जामिनावर अजूनही निर्णय नाहीफोटो स्रोत,ऋएढध खच-ऋएड

सर्वोच्च न्यायालयाने दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या जामीन याचिकेवर मंगळवारी कोणताही निर्णय दिलेला नाही. यासंदर्भात येत्या काही दिवसांत निर्णय दिला जाऊ शकतो, असे संकेत सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.

सर्वोच्च न्यायालयात दिल्लीच्या रद्द केलेल्या दारू धोरणाशी संबंधित मनी लाँड्रिंग प्रकरणात केजरीवाल यांच्या जामीन याचिकेवर सुनावणी सुरू आहे.

केजरीवाल यांना दिलेल्या अंतरिम जामीनाबाबत न्यायालयाने ईडीला प्रश्न विचारले. मात्र, ईडीच्या वतीने न्यायालयात हजर झालेल्या



तुषार मेहता यांनी याला विरोध केला. यावर मेहता म्हणाले, न्यायालय या प्रकरणाला विशेष प्राधान्य देत असल्याचा चुकीचा संदेश सर्वसामान्यांमध्ये जाईल.

सर्वोच्च न्यायालयाने म्हटलंय की, केजरीवाल मुख्यमंत्री असल्यामुळे त्यांना अंतरिम जामीन देण्याचा आम्ही विचार करतोय असं नाही. २१ मार्च रोजी अरविंद केजरीवाल यांना ईडीने मनी लाँड्रिंग प्रकरणात त्यांच्या राहत्या घरातून अटक केली होती. ५५ वर्षीय केजरीवाल यांना दिल्ली उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर अटक करण्यात आली होती. यात न्यायालयाने त्यांना ईडीच्या अटकेपासून संरक्षण देण्यास नकार दिला होता. ईडी आणि सीबीआयचा असा आरोप आहे की दिल्ली सरकारने आपल्या उत्पादन शुल्क धोरणाद्वारे परवानाधारक दारू व्यापाऱ्यांना लाच घेऊन अवाजवी फायदा करून दिला.

## विदर्भात उष्णतेच्या लाटेनंतर गारपिटीसह पावसाचा इशारा

**राजदंड न्युज नेटवर्क**

सोमवारी (६ मे) विदर्भातील ११ पैकी तब्बल १० जिल्ह्याचे तापमान ४० अंशाच्या वर होते. पण आजपासून १० मे पर्यंत विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये मेघगर्जना व वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

यवतमाळ चंद्रपूर नागपूर अमरावती व वर्धा या पाच जिल्ह्यांमध्ये गारपिटीचा इशारा देण्यात आलेला आहे. हवामान विभागाने सर्व जिल्ह्यांना येल्लो अलर्ट जारी केलाय. त्यानुसार पहाटेच नागपुरात पावसाने हजेरी लावली.

सायकलोनिक सर्क्युलेशनमुळे अशी परिस्थिती निर्माण झाल्याचं नागपूर प्रादेशिक हवामान विभागाकडून सांगण्यात आले.

# इस्लामपूरमध्ये महाविकास आघाडी आणि महायुतीचे कार्यकर्ते एकमेकांना भिडले



**राजदंड न्युज नेटवर्क**

सांगलीच्या हातकणंगले लोकसभा मतदार संघातल्या इस्लामपूरमधल्या साखराळे या ठिकाणी महायुती आणि महाविकास आघाडीचे कार्यकर्ते एकमेकांना भिडल्याचा प्रकार घडला आहे.

साखराळे इथल्या मतदान केंद्रावर हा राडा झाला आहे. महायुतीचे उमेदवार धैर्यशील माने आणि महाविकास आघाडीचे उमेदवार सत्यजित पाटील सरूडकर यांच्या कार्यकर्त्यांमध्ये हा राडा झाला.

हातकणंगले विशेष म्हणजे याच मतदान केंद्रावर राडा होण्याच्या काही वेळ आधी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आपला मतदानाचा हक्क बजावला होता. त्यानंतर काही वेळातच या ठिकाणी मतदान केंद्रांमध्ये बोगस मतदान प्रतिनिधी महाविकास आघाडीकडून बसवण्यात आल्याचा आरोप करत महायुतीचे उमेदवार धैर्यशील माने यांच्या कार्यकर्त्यांकडून आक्षेप घेण्यात आला.

त्यामधून महाविकास आघाडीचे सत्यजित पाटील सुरडकर गटाचे कार्यकर्ते यांनी आणि महायुतीचे धैर्यशील माने गटाचे कार्यकर्ते यांच्यात वादावादी सुरू झाली आणि एकमेकांच्या अंगावर धावून मारामारीचा प्रकार देखील घडला. त्यामुळे मतदान केंद्रावर गोंधळाचे वातावरण निर्माण झालं होतं. या ठिकाणची मतदान प्रक्रिया काही वेळ ठप्प झाली होती. मात्र पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्याने या ठिकाणचा अनर्थ टळला आहे. आता सध्या या ठिकाणी मतदान प्रक्रिया सुरळीतपणे सुरू आहे.पण काही काळ तणाव वातावरण निर्माण झाला होता.

# निवडणुकीत पुन्हा आला पाकिस्तानचा मुद्दा, काय म्हणाले पंतप्रधान मोदी?

**राजदंड न्युज नेटवर्क** यंदाच्या (२०२४) लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात पुन्हा पाकिस्तानचा मुद्दा चर्चेत आला आहे. पंतप्रधान मोदींनी अहमदनगरमधील एका प्रचारसभेत काँग्रेसवर हल्ला चढवला.

पंतप्रधान मोदींनी काँग्रेसवर टीका करताना म्हटलं की, काँग्रेसला प्रोत्साहन देण्यासाठी सीमेपलीकडून ट्विट केले जात आहेत. त्याबदल्यात काँग्रेस अतिरेकी हल्ल्यांबाबत पाकिस्तानला क्लीन चीट देते आहे.

मध्य प्रदेशातील खरगोन मध्ये झालेल्या प्रचार सभेत बोलतानादेखील पंतप्रधान मोदी म्हणाले, पाकिस्तानविषयी काँग्रेसला इतकं प्रेम का वाटतं आणि आमच्या सैन्याविषयी त्यांना इतका तिरस्कार का आहे?

निवडणुकीत पुन्हा आला पाकिस्तानचा मुद्दा, काय म्हणाले पंतप्रधान मोदी?फोटो स्रोत,-छ्ख

पंतप्रधान मोदी म्हणाले, काँग्रेसच्या एका माजी मुख्यमंत्र्यांनं म्हटलं की आमचं सैन्य अतिरेकी हल्ले करतं, पाकिस्तान निर्दोष आहे. काँग्रेसच्या एका मोठ्या नेत्याचा निर्लज्जपणा पाहा. ते म्हणाले की मुंबईवर झालेल्या अतिरेकी हल्ल्यात पाकिस्तानचा सहभाग नव्हता.

पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले, काँग्रेसच्या मित्र पक्षाचे आणखी एक नेते भारताला धमकी देतात आणि म्हणतात की पाकिस्तानने बांगड्या घातलेल्या नाहीत.



# राहुल गांधी अमेठी सोडून रायबरेलीच्या मैदानात

**राजदंड न्युज नेटवर्क**

शुक्रवारी सकाळपर्यंत कोणालाही या गोष्टीचा अंदाज नव्हता की काँग्रेस पक्ष सर्वांना धक्का देणारा निर्णय घेणार आहे.

गुरुवारी रात्री उशिरापर्यंत असाच कयास बांधला जात होता की राहुल गांधी अमेठी मतदारसंघातून निवडणूक लढवतील आणि रायबरेली मतदारसंघातून कोणाला उभं करावं याबद्दल काँग्रेसमध्ये गोंधळाचं वातावरण आहे. मात्र गुरुवारी रात्री उशिरा झालेल्या बैठकीत जे झालं त्याचा अंदाज कोणालाही नव्हता.

मागील १५ दिवसांपासून राहुल गांधी आणि अमेठी मतदारसंघाविषयी जोरदार चर्चा सुरू होती. या चर्चेला पूर्णविराम देत राहुल गांधी यांनी रायबरेली लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला. तर अमेठी मतदारसंघातून काँग्रेसचे विश्वासू किशोरी लाल शर्मा यांना तिकिट देण्यात आलं आहे.



राहुल गांधी रायबरेली मतदारसंघातून निवडणूक लढवणार असल्याचं जाहीर झाल्यानंतर काँग्रेस नेत्यांबरोबरच रायबरेलीतील सर्वसामान्य जनतेमध्येदेखील मोठा उत्साह पाहायला मिळाला.

मात्र भाजपाच्या कार्यकर्त्यांचं म्हणणं आहे की रायबरेलीची जनता राहुल गांधी यांना निवडून देणार नाही. राहुल गांधी रायबरेली मतदारसंघातून निवडणूक लढवणार असल्याचं स्पष्ट झाल्यानंतर काँग्रेस नेत्यांमध्ये आनंदाचं वातावरण दिसतं आहे.

उत्तर प्रदेश काँग्रेस समितीचे सदस्य असलेले राहुल बाजपेयी म्हणाले, राहुल गांधी तरुण आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर बोलत आहेत आणि देशातील भ्रष्टाचारी सरकारविरुद्ध लढत आहेत. ते रायबरेलीतून निवडणूक लढवत आहेत हे आमचं सौभाग्य आहे.

गमतीचा भाग म्हणजे काँग्रेसचे विश्वासू आणि सोनिया गांधी यांचे प्रतिनिधी किशोरी लाल शर्मा यांनी एक मेला रायबरेली आणि अमेठीमध्ये पक्षाच्या कार्यकर्त्यांची आणि नेत्यांची बैठक घेतली होती. त्या बैठकीत देखील रायबरेली आणि अमेठीतून काँग्रेसच्या तिकिटावर नेमकं कोण उभं राहणार हे किशोरी लाल सांगू शकले नव्हते. सोनिया गांधी, प्रियंका गांधी आणि काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांच्यासोबत राहुल गांधी आपला उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी पोचले होते. राहुल गांधी रायबरेलीतून निवडणूक लढवणार असल्याचं जाहीर होताच समाजवादी पार्टीच्या कार्यकर्त्यांची देखील गर्दी दिसून आली.